# माणूस

शनिवार । ३१ जुलै १९७१ । पन्नास पैसे




१. बेकारी २. धनिकशहांकडून विविध मार्गांनी होणारे शोषण ३. संपत्ती व विशेषतः उत्पादनसाधनातील विषमता व श्रम न करता उत्पन्न मिळण्याची व्यवस्था, आणि विविध कारणांनी होणारी भाववाढ ही गरिबीची चतुर्विध कारणे दिसतात. गरिबी हटविण्यासाठी या चारही दिशांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. केवळ एकाच दिशेने प्रयत्न करून भागेल असे मानणे चूक आहे. भाववाढ रोखणे हा नकारात्मक भाग होय. रोजगार वाढविणे हा भरीव कार्यक्रम होय आणि शोषण व विषमता नष्ट करणे हा आजची गरीबी हटवण्याचा काही प्रमाणात व उद्याची गरिबी निर्माण होऊ न देण्याचा महत्त्वाचा उपाय होय. केवळ रोजगार वाढविला आणि इतर उपाय योजले नाहीत तर गरिबी हटेल याची शाश्वती नाही. याचा अर्थ कुठल्या एका दिशेने प्रयत्न करू नये, किंवा त्यात मोडता घालावा असा नाही. पण त्याचबरोबर यापैकी एक मार्ग म्हणजेच संजीवनी मंत्र होय आणि इतर मार्ग विषवत् होय असे म्हणणेही असमंजसपणाचे आहे.

या दृष्टीने प्रा. दांडेकर यांनी आपल्या प्रतिपादनात सुधारणा करण्याची गरज आहे.

—पन्नालाल सुराणा





# नगरवाला प्रकरणात राजीव गांधींचा हात ?

## दिल्लीतली एक वदंता

नगरवाला प्रकरणावर
अधिक प्रकाशझोत

कदाचित पुढील अंकीच....

| | | | |
|---|---|---|---|
| माणस | शनिवार | ३१ जुलै १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| अकरा | नऊ | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार

¤ आपले १० जुलै व १७ जुलै हे दोन्ही अंक वाचले. दोन्ही अंक वाचून अतिशय खूष झालो. विशेषत: 'ज्ञात अज्ञाताच्या सीमारेषेवर' ही लेखमाला आवडली. या विषयातल्या विद्वानांची खरी मते कळली व या भोवतालची गूढता नष्ट झाल्यासारखे वाटले. दि. १७ जुलैच्या अंकातील भिसे गुरुजींची रवींद्र पिंगे यांनी करून दिलेली ओळख आवडली. सोन्यावरचा लाल इलम! हा लेखही आवडला. एक सूचना अशी, की माणूसमध्ये वाचकांच्या सोयीसाठी अनुक्रमणिका दिल्यास फारच उत्तम होईल. शक्यतोवर क्रीडा व चित्रपट ही सदरे टाळू नयेत.

१८ जुलै, १९७१ — अजय शहा, मालेगाव

¤ १७ जुलैचा अंक वाचला. आवडला. रवींद्र पिंगे शतपावली या सदराखाली व्यक्तिचित्रण चांगले करतात. आचार्य भिसे आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ही त्यांची व्यक्तिचित्रणे उत्कृष्ट आहेत.
कविता सदरात पण चांगल्या कविता असतात. या अंकातील 'सुगंध ठेवा' ही कविता तर फारच आवडली.
सुधाकर घारपुरे यांची वैज्ञानिक सत्यकथा आवडली.
जिप्सी मधुकान्त फारच सुंदर लिहितात. त्यांच्या कथा मनोरंजक असतात.

१९ जुलै, १९७१ — हेमंत जावळी, बार्शी

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

अरुण गोसावी

# मुंबई वार्ता

## विद्यापीठे की राजकीय आखाडे ?

महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या राजकारणाला अगदी अलीकडे गलिच्छ वळण लागत असल्याची जी चिन्हे दिसत आहेत ती मोठी धोकादायक आहेत—मागे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठासंबंधी तक्रारी ऐकू येत होत्या. मध्ये पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या निवडणुकीचे प्रकरण हायकोर्टापर्यंत गाजले तेव्हा तिथलीही हाणामारी चव्हाटयावर आली होतीच. महात्मा फुले कृषि विद्यापीठात कसे गैरप्रकार चालू आहेत हे पुण्याच्या विद्यार्थ्यांनी उघडकीला आणलेतच. आता पाळी आहे मराठवाडा विद्यापीठाची. म्हणजे नागपूर आणि मुंबई विद्यापीठे ही अगदी राजकारण मुक्त आहेत असे नव्हे. पण सध्या तरी तेथल्या कारवाया थंड दिसतात. सध्या जरा जोरात गाजताहेत ती म्हणजे कृषि व मराठवाडा विद्यापीठे.

पैकी मराठवाडा विद्यापीठाला तर आता राज्यपातळीवरील राजकीय आखाड्याचे स्वरूप आलेले दिसत असून अनेक मंत्र्यांच्या तोंडावर तिथली लाल माती दिसते आहे. मातब्बर मंत्री लंगोट कसून आणि दंड थोपटून तिथे आपापली ताकद अजमावून बघत आहेत असे दिसते. एवढेच काय राज्याच्या चँपियनशिपसाठी लागणाऱ्या जंगी मैदानाची पहिली फेरी तर मराठवाडा विद्यापीठाच्या आखाड्यात चालू नाही ना अशी शंका येते.

गेले दीड वर्ष या विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचे घोंगडे भिजत पडले आहे. सध्याचे कुलगुरु श्री. एन. आर. तावडे यांची मुदत दीड वर्षापूर्वीच संपली आहे. पण नवे कुलगुरु अजून निवडले गेले नाहीत. या निवडीला एवढा उशीर का होत आहे ? तर राज्यपातळीवरील राजकारण.

मराठवाड्याचे नेते आणि उपमुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या अडवणुकीमुळे कुलगुरुंची निवड लांबणीवर पडत अहे असा आरोप करण्यात येतो. श्री. चव्हाण यांना हा आरोप अर्थातच मान्य नाही. मागच्या आठवड्यात एका दैनिकाला मुलाखत देऊन कुलगुरुंच्या निवडणुकीच्या आड आपण कधीही आलेलो नसल्याचे त्यांनी जाहीर करून टाकले.

कुलगुरुंच्या निवडीसाठी जे पहिले पॅनेल सुचविले होते त्यात श्री. गोविंदभाई

श्रॉफ, श्री. देवीसिंह चौहान वगैरेंचा समावेश होता. पण ही नावे म्हणे श्री. चव्हाणांना मान्य नव्हती. त्यामुळे दुसरे पॅनेल सुचविले गेले आणि त्यामध्ये चव्हाणांचे बंधू श्री. नारायणराव चव्हाण यांचा समावेश होता. त्यांची निवड व्हावी असा शंकररावांचा आग्रह तर इतरांचा विरोध. श्री. नारायणराव चव्हाण स्वतःच निवड समितीत असल्याने इतरांचा विरोध जास्त. यामुळे ही निवड लांबणीवर पडत असल्याचे आरोप होते.

-श्री. चव्हाण यांचे म्हणणे असे, ' की पहिल्या पॅनेलपैकी कुणाच्याच नावावर निवड समितीत एकमत होत नव्हते. त्यामुळे दुसरे पॅनेल सुचविले गेले. त्यामध्ये काही आमदारांनीच श्री. नारायणराव चव्हाणांचे नाव एकमताने सुचविले. त्यांचे नाव मी सुचविले नाही किंवा मला कुणी विचारलेही नाही. कुलगुरु अमुक एकालाच करावे असा माझा आग्रह नाही. गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा. या प्रकरणी मी कुणावरही दडपण आणलेले नाही. '

चव्हाणांची ही मुलाखत प्रसिद्ध झाल्यावरच खरी गंमत आली. सकाळी मुलाखत वाचल्यावर अनेक मंत्र्यांचा पारा चढला म्हणे. मराठवाड्यातील एका राज्यमंत्र्याने तर दुपारी तातडीने वार्ताहरांना बोलाविले आणि जाहीर आरोप केला म्हणे की मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या नेमणुकीला जो वेळ होतो आहे तो श्री. चव्हाणांच्या अडवणुकीच्या धोरणामुळेच.

महाराष्ट्र मंत्रीमंडळातल्या एका मंत्र्याने जाहीरपणे दुसऱ्या मंत्र्यावर आरोप करण्याचा प्रसंग विरळाच. त्यामुळे बातमीदार चमकले. त्यांनी पुन्हा पुन्हा या राज्यमंत्र्यांना विचारले, आपण विचार करून हा आरोप करता आहात ना? इतरांचा सल्ला घेतला आहे ना? हे म्हणाले, मी मराठवाड्याचा प्रतिनिधी म्हणून आरोप करतो आहे. झाले. बातमीदारांना काय, सनसनाटीच हवी असते. त्यांनी आपापल्या स्टोऱ्या तयार केल्या, वृत्तपत्रांनी तर बातम्या इतर गावांना पाठवायलाही सुरुवात केली. एवढ्यात मुख्यमंत्र्यांच्यातर्फे कुणीतरी फोन केला आणि बातम्या अडविल्या गेल्या. आळी मिळी गुपचिळी.

दरम्यान मराठवाड्याच्या दुसऱ्या एका मंत्र्याने सांगितले, ' कशाला हा वाद उकरून काढताय? कुलगुरुंच्या निवडीचा निर्णय आधीच झाला आहे ! '

अशी जरा थोडीशी गंमत आली. पण त्यामध्ये अनेक गोष्टी उघडकीला आल्या. या जबाबदार राज्यमंत्र्याला एवढ्या तातडीने पत्रकारांसमोर जाहीर आरोप करण्याची काय गरज होती. शिवाय सर्वांना विचारून हे मंत्रीमहाशय असा आरोप जाहीर करीत असतील तर त्यामागे कुणाचा हात होता? पण ऐनवेळी मात्र बातम्या मागे घेतल्या गेल्या त्या तरी का म्हणून? यात जरा वरच्या राजकारणाचा तर वास येत नाही ना?

श्री. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्रीपदाचे इच्छुक आहेत हे तर सर्वश्रुतच आहे.

आणि त्यांचा काटा काढण्याच्या मार्गावर अनेक मंडळी फार पूर्वीपासून आहेत. त्यातलेच तर हे प्रकरण नाही ना, अशी शंका येते. मागे योजनांच्या बाबतीत मराठवाड्यावर अन्याय होतो, पैसा मिळत नाही म्हणून शंकररावांनी राजीनाम्याची धमकी दिली होती. त्याही आधी एका विधानमंडळीय समितीने पाटबंधाऱ्यांच्या बाबतीत मराठवाड्यामध्ये ज्या गतीने कामे चालतात त्या गतीने इतर भागात कामे चालत नाहीत, अशी सूक्ष्म टीका केली होती.

१९७२ मध्ये मुख्यमंत्रीपदावर मराठवाड्याचा क्लेम आहे खरा. आणि मराठवाड्याचा स्ट्रॉंग मॅन म्हणजे श्री. शंकरराव चव्हाण. पण त्यांच्याच भागातले एक मंत्री मराठवाड्याचे प्रतिनिधी म्हणून चव्हाणांवर जाहीर आरोप करताहेत हे दृश्य कसे दिसते ? अवघ्या मराठवाड्याचे नेतृत्व तुम्हाला कमाविता येत नाही तर सगळा महाराष्ट्र तुम्ही कसा सांभाळू शकाल, असे कुणीही त्यांना विचारू शकेल. कुणीही म्हणजे साहेब. आता रात्री फोन गेले, बातमीदारांनी बातम्या मागे घेतल्या आणि लोकांना या जाहीर आरोपाच्या गोष्टी कळल्या नाहीत ही गोष्ट वेगळी. पण समजा कळल्या असत्या तर ?

खरं म्हणजे या सगळ्याच गोष्टी संदिग्ध आहेत. या संदर्भात या राज्यमंत्र्यांनी खरोखरच अशी पत्रकार परिषद घेतली की काय हेही नक्की अनुमान काढता येत नाही. कारण समारंभपूर्वक पत्रकार परिषद बोलावून एक मंत्री जाहीर आरोप करतो काय, बातमीदार बातम्या तयार करतात काय आणि केवळ रात्री फोनवरून विनंती केली जाते म्हणून बातम्या मागे घेताहेत काय यावर विश्वास बसत नाही. म्हणजे कोणीही येऊन गालगुच्चा घ्यावा एवढे काय बातमीदार बोळ्याने दूध पितात ? हे म्हणजे इंदिरा गांधींनी लाल किल्ल्यावरून जाहीर सभेत एखादी घोषणा करावी आणि दुसरे दिवशी एखादे पत्रक काढून काल आपण काही बोललोच नाही असे भारतीय जनतेने समजावे असे सांगावे, अशासारखेच झाले. त्यामुळे जरा शंका येते एवढेच. पण बातमीदारांच्या बाबतीतही काही सांगता येत नाही. असो. हा मुद्दा आहे गैरलागू.

तर मूळ मुद्दा मराठवाड्याच्या क्लेमचा. मराठवाड्यातल्या माहीतगार लोकांच्या म्हणण्याप्रमाणे अशी कितीही वादळे आली तरी श्री. शंकरराव चव्हाण हटणार नाहीत. त्यांची तयारी जोरात चालू आहे. केवळ मराठवाड्यातच नव्हे तर बाहेरही. अगदी विदर्भातलेसुद्धा आमदार आणि मंत्री ते आपल्या बाजूने वळवीत आहेत. अर्ध्याच्या वर आमदार तर नक्कीच त्यांच्या बाजूचे आहेत म्हणे.

मराठवाड्याचे दुखणे फार नाजूक आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीपासून इतर भागांपेक्षा मराठवाड्याची प्रगती जरा मागेच राहिली हे गाऱ्हाणे बरेचसे खरे आहे. त्यामुळे मराठवाड्यातले आमदार संतप्त आहेत. आपल्या भागाच्या प्रगतीला वेग

पृष्ठ ६४ वर

# निक्सन–चीन आणि भारत

निक्सनचे संरक्षण सल्लागार हेन्द्री किसिंजर ( आकाशवाणीच्या एकाच वार्तापत्रात याचा उच्चार किसिंजर, किसिंगर, आणि किसिझर असा होताना ऐकला का? ) भारत आणि पाकिस्तानला भेटून गेले, त्यामागे उद्देश दोन्ही देशांना खुष ठेवणं असा होता म्हणतात. (म्हणजे बंगला देशच्या बाबतींत अमेरिकेने पाकची छुपी कड घेतली त्यामुळे भारत चिडून, तर शस्त्रास्त्रांचा पुरवठा बंद केल्यामुळे पाक चिडून

पाकिस्तानला शस्त्राची जहाजे पाठविल्यामुळे अमेरिकेत तर निक्सनची छी : थू झालीच, पण जगभरहि निंदा झाली. पण या बोटीत तसं भयंकर काही नव्हतं अशी ग्वाही देण्यासाठी किसिंजर भारतात आले–निक्सनचा खास निरोप घेऊन. पंतप्रधान गांधींना कितपत पटलं कुणास ठाऊक.

पण याह्याखानांनी पाहुणे आजारी आहेत असं भासवून त्यांची चीन भेट घडवून आणली. रहस्यकथेला शोभेल अशा धर्तीवर घटना घडत गेल्या. निक्सनची चीन भेट निश्चित झाली.

याचा अन्वयार्थ काय ?

भारताने या नव्या हालचालींच्या संदर्भात कसे वागले पाहिजे ?

राजकारण्यांची मतं भिन्न भिन्न असतीलच. त्यात पुन: प्रत्येकाचे हितसंबंध गुंतलेले. म्हणून संरक्षण खात्याच्या दोघा माजी सचिवांची मनं काहीही टिप्पणी न करता देतो.

पी. व्ही. आर. राव आणि व्ही. शंकर या दोन्ही माजी सचिवांना वाटतं की देशाच्या परराष्ट्र धोरणांत आता आमुलाग्र बदल आवश्यक आहे.

राव म्हणतात : चीन आणि अमेरिका आशियात वर्चस्व प्रस्थापित करू लागतील तेव्हा हाती असलेल्या सर्व साधनांनी मुत्सद्देगिरीच्या संदर्भात भारताने याला विरोध केला पाहिजे.

यासाठी भारताने चीन बरोबरचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अमेरिकेसारखे भांडवलवादी राष्ट्र कम्युनिस्ट चीनबरोबर संबंध सुधारू बघतो आहे, तर भारताने स्वत:च्या फायद्याकरता तरी अशा दिशेने पावले टाकली पाहिजेत.

निक्सनच्या भेटीमुळे अगदी पहिला महत्वाचा परिणाम होणार आहे. चीनचा युनोत लवकर प्रवेश. भारताने प्रवेशासाठी होणाऱ्या या प्रयत्नांचे स्वागत केले पाहिजे.

चीनचा भारताला एवढा कडवा विरोध का आहे ? राव म्हणतात मला वाटते चीन आणि अमेरिका यांच्या संघर्षात भारत भांडवलवाद्यांच्या कह्यांत जाईल.

त्यामुळे चीन–अमेरिका संबंध सुधारले की भारत–चीन मधला तणावही कमी

होईल. कदाचित त्यातूनच भारताबरोबरचे वाद मिटविण्यासाठी संधी निर्माण होईल.

चीन–अमेरिका संबंध सुधारल्यामुळे आणखी एक होईल. पाकिस्तान दोन्ही देशाच्या हातचे खेळणे बनेल. बंगला देशामधील अस्थैर्य अजून काही काळ टिकले तर पाकिस्तानच्या या भागात किंवा पश्चिमेतही कम्युनिस्ट राजवट आणण्याची संधी चीन दवडणार नाही.

मग वैफल्यामुळे पाकिस्तान भारताविरुद्ध जिहाद पुकारण्याची भाषा करू लागेल.

शंकर यांचेही मन याच्याशी मिळते जुळते आहे. निक्सन भेटीमुळे त्या दोन देशातील संबंध सुधारले तर आपल्यालाही चीन बरोबरचा सीमावाद आणि पाकशी असलेले संबंध याबाबत पुनर्विचार करावा लागेल.

किसिंजरांची आणि अप्रत्यक्षरित्या निक्सनची चीन भेट घडवून आणण्यांत पाकने जो पुढाकार घेतला त्यावरून पाकने–अमेरिका संबंधातही फार मोठा बदल होणार आहे हे निश्चित. त्यामुळेच पाक व चीन विरुद्धच्या संरक्षणाबाबत भारताला फेरविचार करावा लागेल.

इतके दिवस सीमेकडे कानाडोळा केल्याने संरक्षणाचा प्रश्न आता एकदम अवाढव्य वाटू लागेल.

आता भारताने संरक्षणासाठी सर्वसामान्य जनतेपर्यंत गेले पाहिजे. जर्मनी आणि फ्रान्सच्यामध्ये अडकून पडलेल्या स्वीस जनतेने संरक्षण प्रयत्नाला साद दिली तशी भारतीय जनतेने दिली पाहिजे.

शंकर – संरक्षण खात्याचे माजी सचीव – अण्वास्त्रांबद्दल काय म्हणतात ते सर्वात महत्वाचं.

> "अणुशक्तीचा उपयोग केवळ शांततेसाठी करण्याचा अवास्तव अट्टाहास सोडून भारताने लवकरात लवकर एखाद्या अण्वस्त्र गटात प्रवेश केला पाहिजे."

रशियाकडे कल दाखविल्यामुळे; काही प्रमाणात तरी, अमेरिका आणि ब्रिटनचे माप पाकच्या बाजूने झुकते झाले आहे. आता चीन या खेळात शिरल्यामुळे भारत आणखीनच अडचणीत सापडणार आहे. कारण चीन रशियामधली तेढ जगजाहीर आहे.

भारताच्या संरक्षण प्रश्नांचे जाणकार या दृष्टीने या दोघांच्या मुलाखतींचा गोषवारा दिला. नाहीतर आमचे परराष्ट्रमंत्री जोशीच्या आवाजात सांगून गेलेच – हु 'याह्याखानला म्हणावं आम्हीही एकटे नाही आहोत–!'

## एक शक्यता

मध्यंतरी केंद्रीय मंत्रीमंडळात पुनः फेररचना होणार असल्याची बातमी उठली कशी माहीत आहे ?

रेल्वेच्या कारभारासंबंधी, कार्यक्षमतेसंबंधी पार्लमेंटमध्ये त्या खात्याचे मंत्री हनुमंतय्यांवर झोड उठली. पण पंतप्रधान गांधींनी त्यांना संरक्षण दिले नाही.

राजकीय निरीक्षक म्हणून एक वेगळीच जात असते. या जातीपैकी कुणालातरी वाटलं हनुमंतय्या बाईंच्या मर्जीतून उतरले :

त्या पाठोपाठ सिद्धार्थ शंकर रेंना बंगालसंबंधीचं खातं सोपविण्यात आले. त्यामुळे दोन जागा रिकाम्या झाल्या. मग राजस्थानच्या सुखाडियांनी मुख्यमंत्री पदाचा राजिनामा दिला. त्याजागी गृहखात्याचे राज्यमंत्री मिर्धा किंवा संसद कामकाज मंत्री राज बहाद्दूर यांची नेमणूक होईल असं ' निरिक्षकां 'ना वाटलं.

तिकडून फक्रुद्दिन अली अहमद पश्चिम आशियातून हात हलवत परतले. त्यांचेही दिवस भरले अशी हाकाटी झाली. निरीक्षकांनी अनेक उभे आडवे दावे केले.

अजून मंत्रीमंडळ तेच कायम आहे.

## आता नंबर बाबूंचा

आता बोलवा आहे जगजीवनराम यांच्या स्थानाविषयी. बंगला देश प्रश्नावरून केंद्रीय मंत्रीमंडळात मतभेद झाले. अशी बातमी 'पॅट्रियट'ने दिली. हे दैनिक म्हणजे इंदिरा गांधींचं नॅशनल हेराल्डसारखंच दुसरं मुखपत्र.

बंगला देशाबाबत भारताने पाकिस्तानशी सरळ दोन हात करावे असं बाईंना वाटतं तर परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग आणि संरक्षण मंत्री जगजीवनराम त्याला तयार नाहीत. त्यामुळे या दोघांना वाटेतून दूर करायचा बाईंचा विचार असल्याचे पॅट्रियटचे म्हणणे.

जगजीवनरामांनी निवडणुकीच्या ऐन मोसमात इंदिरा गांधींवर अप्रत्यक्ष टीकेची झोड उठविली होती. त्या आधी १९६९ डिसेंबरच्या कॉंग्रेस अधिवेशनात जगजीवनरामांनी केंद्रीय मंत्रीपदाच्या बदल्यात पक्षाचे अध्यक्षपद सोडण्याचे कबल केले होते. पण त्यावेळी बहुमत अगदी नाजूक अवस्थेत असल्याने त्यांनी शब्द पाळला नाही हे कुणी मनावरही घेतलं नाही. आता भल्यामोठ्या बहुमताच्या जोरावर बाबूंना बाहेर कसं काढायचा असा बाई विचार करत आहेत म्हणे !

## या वर्षी चाळीस टक्के पुढच्या वर्षी तीस टक्के

दिल्ली विद्यापीठाने यंदा मॅट्रिकला चाळीस टक्के मार्क्स असलेल्यांना कॉलेज प्रवेश देण्याचे जाहीर केले. पण प्रत्यक्ष दर्जेदार कॉलेज किमान ४५ टक्के वाल्यांनाच प्रवेश देऊ लागले.

विद्यापीठाचा पोस्टल कोर्स असला तरी विद्यार्थी तो टाळतात. सगळ्यांना कॉलेज हवे असते. दिल्ली अॅडमिनिस्ट्रेशनने मग प्रवेश न मिळालेल्यांची नाव

**पृष्ठ ६३ वर**

रवींद्र पिंगे

# अबोलीच्या परिसरात

बाळपणातली गोष्ट. मी गोव्याहून मुंबईला परतत होतो. बोटीने वेंगुर्ले बंदरात नांगर टाकला होता. बंदराचा आसमंत हिरवा आणि ओला होता. वर नीळंभोर आकाश पसरलं होतं. किनारपट्टीवर माडांची राई सळसळत होती. दर्याचं हिरवट निळसर पाणी लख्ख उन्हात फेसाळत होतं. बंदरावरल्या छबिन्यातले चार दोन तांडेल नि पाच-दहा पॅसिजरं सोडली तर मनुष्यवस्तीची अन्य खूण जवळपास दिसत नव्हती. सागरवारा निशाणासारखा फडफडत होता. नारिंगी चोचींची आशाळभूत समुद्रपाखरं घिरट्या घालीत होती. बंदराच्या एका अंगाची एक टेकडी पाणी पिण्यासाठी खाली लवलेल्या वाघासारखी अंग वाकवून पवित्र्यात समुद्रात घुसली होती. नाटकातल्या राजाच्या मस्तकावर मुकूट ठेवलेला असावा, तसा त्या टेकडीच्या गंडस्थळावर, सत्ता राबवायला सातासमुद्रापलीकडून आलेल्या साहेबाने आराम करायला सुंदरसा डाक बंगला बांधलेला होता. मी तो बोटीच्या डेकवरून पाहिला. खरं म्हणजे सारा परिसर विसरून मी तो वेंगुर्ल्याचा डाकबंगला निरखीत राहिलो. मनात विचार आला, 'ह्या अशा निवांत बंगल्यात मला कधी वस्ती करायला मिळेल का ?' बंगल्यावर खिळलेली नजर हालेना. बोटीने नांगर ओढून घेतला. मुंबईच्या दिशेने ती भरधाव निघाली. पाणी मागे–मागे वाहू लागलं.

काळाचं पाणी असं गेली तीस वर्षे मागे–मागे वाहात गेलं.

पुनरपी मी वेंगुर्ल्याच्या बंदरात हजर झालो. तसा वेंगुर्ल्यावरून बाहेरच्या बाहेर अनेकवेळा गेलो होतो. ह्यावेळी बंदरात उतरणार होतो. ह्यावेळी धगधगीत दुपार नव्हती. गार पहाट होती. मी डेकवर होतो. खांद्याला टेपरेकॉर्डर अडकवलेला होता.

सोनशेंदरी प्रकाशाने हिरवाचार परीसर उजळून निघाला होता. टेकडीवरचा बंगला होता तसाच, होता तिथेच, भिंतीला अडकवलेल्या बालामृताच्या कॅलेंडरातल्या गुटगुटीत हंसऱ्या बाळासारखा विलोभनीय दिसत होता. त्याच बंगल्यात ह्या वेळी माझी सोय, किंवा सरकारी शब्द वापरायचा म्हणजे 'बंदोबस्त' करण्यात आलेला होता. मन पुलकीत झालं होतं.

'तुम्ही त्या राजवाडयात उतरणार असाल.' माझ्या शेजारच्या गृहस्थाने विचारलें. प्रवासात त्यांची ओळख झाली होती.

'हो. तुम्ही ?'

'आम्ही गावात उतरणार. आमच्या नशिबात काय राजवाडा असणार आहे ?'

'तुम्ही निष्कारणी मोठे शब्द वापरता बुवा. अहो, हा राजवाडा नाही. हा प्रवासी डाकबंगला आहे.'

'पण पूर्वी ह्या बंगल्यात कलेक्टरसाहेब कँप करायचे. तेव्हापासून लोक ह्याला राजवाडाच म्हणतात.'

'विसरा हो ते कलेक्टरांच्या मिराशीचे दिवस. आता इथं कुठलाही फडतूस सरकारी माणूस राहू शकतो. नि जागा रिकामी असेल तर तुम्हीही फी भरून राहू शकता.'

'पण हा डाकबंगला ना ?'

'अहो, ह्या बंगल्यात फिरतीवरल्या सरकारी अधिकाऱ्यांचे पट्टेवाले पूर्वी टपाल घेऊन यायचे. टपाल म्हणजे पोष्टाची डाक. म्हणून हा डाकबंगला झाला. आता हे डाकबंगले सर्व प्रवाश्यांना मुक्त असतात. चला, तुमचीही सोय लागते का पाहू या.'

'नको. आम्ही बामच्या डब्या विकणारें. आम्हाला तो थाट परवडायचा नाही.'

'का ? कोकणात बाम खपत नाही ?'

'आता बामाचे दिवस सगळीकडेच संपत आले आहेत. पाच पैशांच्या गोळीने जर मस्तकशूळ नाहीसा होतो, तर दीड रुपयांची बामची डबी बाळगतोय कोण ?'

'मग तुमचं कसं भागतं ?'

'आमचं कोकण म्हणजे एक मोठा थोरला आड आहे. आम्ही त्यात अडकून पडलेलो आहोत. आता हातपाय हलवीत राहाण्याशिवाय गत्यंतरच नाही. कधी कधी दिवसाची एक पण डबी खपत नाही. खपल्या तर तीन-चार सुद्धा जातात. कशाचा काही नेम नाही बघा ह्या कोकणात. पूर्वी मी पोष्टाचा माल विकत होतो. चार पैसे सुटायचे. आता सगळेच शिकलेले झाल्यायत नि गावोगाव पोष्टं झाल्यायत. मग आमच्याकडून कार्डपाकीटे कोण घेणार ? खरं की खोटं ? तेव्हा तो धंदा साफ बसला. आता बाम विकून बघतोय. पण एवढयाने प्रश्न नाही सुटायचा.'

'मग कोकणसाठी काय झालं पाहिजे असं तुम्हाला वाटतं ? उद्योगधंदे निघाले पाहिजेत ?'

'मरोत ते उद्योगधंदे ! आमच्या कूळकायद्यात गिळलेल्या जमिनी परत करा– बस्स ! मग आम्ही एका आण्याची मदत मागणार नाही कुणाकडे की कुणाच्या दारात जाणार नाही. पण करायचं ते हे लोक करणार नाहीत; नि करू नये ते करायला ह्यांचा पहिला नंबर ! एक दिवस ह्या भूमीत बंड होणार हो, तुम्ही लिहून घ्या माझे शब्द ! अरे, अन्यायाला काय सीमा आहे की नाही ? आमच्या जमिनी तुम्ही सरळ सरळ दुसऱ्याच्या घशात ढकलता ? का बाबा ? केवळ हातात सत्ता आहे म्हणून ? वा रे वा राज्यकरणेवाले !'

रत्नागिरीत दोन दिवसांपूर्वी होतो. तिथेसुद्धा कूळकायद्याच्या नावे हीच रड ऐकली. तिथल्या पाध्ये वकिलांना मी म्हटलं,

'हे एकोणीसशे एकाहत्तर साल आहे. आता जमाना सामाजिक न्यायाचा आहे. काळचक्र तुम्ही मागे रेटू शकणार नाही.' तेव्हा वकीलमहाशय त्वेशाने उद्गारले,

'मीच तुम्हाला सांगतो, की काळचक्र कोणी मागे रेटू शकणार नाही. आज नाही उद्या, कुणीतरी मिलीटरीतला माणूस हंटर घेऊन उभा राहील नि ह्यांच्या पाठीवर फटके मारील तेव्हा ह्यांना इंगा कळेल !'

'ह्यांच्या म्हणजे कुणाच्या ?' मी विचारलं.

'ज्यांनी आमच्या जमिनी बळाकावल्या त्यांच्या आणि ज्यांनी हे अन्नाडी कायदे केले त्यांच्याही ! लक्षात ठेवा, ब्राह्मणाचा शब्द खोटा होणार नाही ! म्हणे आम्ही राज्य करतो ! तोंड पहा राज्य करणारांची !

मी हात टेकले.

पडाव बोटीला लागले. त्यात उतरून आम्ही किनाऱ्याला लागलो. कडा चढून डाकबंगल्यावर आलो. राज्य करणेवाल्यांचा उद्धार करणारे ते बाम विकणारे होरपळलेले गृहस्थ आपल्या प्राक्तनाच्या दिशेने निघून गेले.

स्वर्ग कसा असतो ? सांगता येणार नाही. अतीव सुख म्हणजे काय ? तेही सांगता येणार नाही. पण ते जर का कुणाला अनुभविता येणार असेल तर केवळ ह्या वेंगुर्ल्याच्या डाकबंगल्यांतच, इतकी ही वास्तु न्यारी आहे. चारही बाजूंनी मोकळा असलेला हा सर्व सुखसोईयुक्त आधुनिक छोटेखानी प्रासादच आहे. बंगल्याच्या तिन्ही बाजूंनी फेसाळणारा समुद्र आहे. पिछाडीला दूरवर वेंगुर्ले गांव आहे. बंदरापासून गाव मैल, दोन मैल आतल्या अंगाला अडवा पसरलेला आहे. बंगल्याच्या मागल्या पावट्यावर बसलं तर थेट शिरोड्यापर्यंत झुलणारं गर्द बन दिसतं. बंगल्यात वर्दळ अशी नसतेच. फिरतीचे अंमलदार फक्त टेकण्यापुरते येतात नि चालू लागतात. ठिय्या मारून वस्ती कोणीच करीत नाही. डोळ्यासमोर फेसाळणाऱ्या रुद्र दर्याची अखंड गाज हीच काय ती इथली सोबत. आचार्य अत्रे, बाबूराव पेंढारकर, गोविंदराव टेंबे, वगैरे आपल्या पद्धतीने अर्क असलेल्या मंडळींनी ह्या बंगलीत सुखाचे क्षण वेचले होते असं कळलं. त्याचं काहीही वाटलं नाही. पु. ल. देशपांड्यांनी

पृष्ठ ५६ वर

सौ. नलिनी अंबाडे

# हम भी कुछ कम नहीं

उंच गगनचुंबी इमारती म्हटले की डोळ्यांसमोर न्यूयॉर्क येते अन् भारतापुरतेच बोलायचे झाले तर मुंबई ! का कोणजाणे मद्रासला मुंबईचा हेवा फार वर्षापासून वाटतोय. कारण मद्रासला तीनचार मजली इमारतीही असणे मारामार, मग सतरा अठरा मजल्यांच्या 'मलबार हिलवरील' कुठल्या ! आताच मद्रासला एकुलती एकच 'एल. आय. सी.'ची इमारत झाली आहे. तेरा मजली. ती देखील तळमजला धरून तेरा. एवढ्या प्रचंड लोकसंख्येच्या–हिंदुस्थानातील ३ऱ्या क्रमांकाच्या–शहराला ही गोष्ट अभिमानास्पद नव्हे. हे आमच्या 'तमीळघ आरसू' (म्हणजे मद्रासचे राज्य सरकार) मंत्र्यांनी ओळखले. प्रत्येक बाबतीत मुंबई–दिल्लीच कां पुढे ? हम भी कुछ कम नही ! मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, लौकरच राज्य सरकार मद्रासच्या समुद्र किनाऱ्यावर उत्तुंग सेक्रेटरीएट बांधणार आहे. इमारत ६५ मजली असेल व चौदा कोटी रुपये खर्च येईल. मद्रासची 'मरीना' चौपाटी अधिक आकर्षक होईल. इ. इ.

पण मद्रासी विरोधक कसले नतद्रष्ट मेले ! अजून कशाचा पत्ता नाही, तोवर लागले टीका करायला. इमारतीचे कंत्राट कुणाला द्यायचे अद्याप ठरलेले नाही. त्यासाठी 'आपलीच जावई कंपनी' एखादी स्थापन व्हायची आहे. टेंडरे मागवायाची आहेत, कोणत्या मजल्यावर कोणता मंत्री हे ठरायचं आहे–तोवरच विरोध ? विरोधाला तरी काही आधार असावा ? म्हणे मद्रासमधील अर्धी वस्ती झोपडपट्ट्यांत आहे, अन् चौदा कोटींचा खर्च अन् कांहीबाही ! त्यांना हे कळत नाही की ही इमारत आशिया खंडात मोठ्ठी होईल. अशा उंच इमारतीच्या खिडक्यांतून मंत्र्यांना तळाच्या झोपडपट्ट्या दिसणारच नाहीत – अहो नाही तरी त्यांना ती गरिबी पाहावतच नाही म्हणून तर "आरुवत्तंजी पडी माडी" ची योजना !

विरोधकांमध्ये ताण केली 'च्यो'ने ! आपल्या 'तुघलक' ह्या व्यंगचित्र पाक्षिकांत (खप – एक लाख) मधल्या पानावर – म्हणजे सेंट्रल स्प्रेड – सरळ ६५ मजली इमारतीचे संकल्पित चित्र छापले आणि प्रत्येक मजल्याला सरकारच्या एकेका फसलेल्या योजनेचे नाव दिले. उदा. "रुपायाला ३ मापटी तांदूळ" ही डी. एम. के. पक्षाची घोषणा, कार्पोरेशनमधील लांचलुचपत, पुतळे जिवंतपणीच बसवणे, कावेरी पाणी तंटा, जागतिक तमीळ परीषद हिशोब गोंधळ, कूवम नदी उर्फ ड्रेनेज

समाई योजनेचे कडबोळे ! इ. इ. हे सर्व कमी वाटलं म्हणूनच की काय पासष्टाव्या मजल्यावर करुणानिधींचाच पुतळा दाखवलाय – उजवा हात उंचावून भाषण करणारा – !

राज्य सरकारच्या ' सेक्रेटरीएट ' वरून आठवले म्हणून सहज सांगते ! मद्रासला सर्व केंद्रीय सरकारची ऑफिसेस ' शास्त्रीभवन ' नामक एका चारमजली–ऐसपैस–अवाढव्य इमारतीत ठेवून भरलेली आहेत. नुंगमबाकम् विभागात गेलात तर जरूर जा, जवळ जवळ दोनहजार कर्मचारी कारकून असतील. त्यांना चहापाण्यासाठी सरकारी ' ह्या एकाच विशेषणांत तेथील (अ) व्यवस्था ध्यानात यावी. उदा. मला चहापाणी, वडाभाजी, इडलीसांबारम. जेवण इल्ले. प्रथम टोकने घ्या – सेल्फसर्व्हिस–पाणीही कुणी देण्यास नाही – खाल्लेली टेबले तशीच माशा घोंगावणारी – प्रत्येक वस्तूला क्यू – लंचशिवाय इतरवेळी बंद इ. इ. वास्तविक इमारतींतील ५०० जण बसू शकतील एवढा हॉल – लाईट पंख्यांसह फक्त दरमहा ५० पैसे भाड्याने ! २४ तासपाणी, रेशन आणण्यास सरकारी गाड्या इ. इ. सर्व फायदे! पण तरीही जेमतेम दोनवर्षे कसाबसा कारभार रेटून जुलै ११ पासून ते खऱ्या अर्थाने बंद पडले ! जेमतेम दोन लाखांची उलाढाल होऊन सहा हजारांचा लॉस आला म्हणे ! शिवाय तुंबलेली बिले देण्याची राहिलीत ती निराळीच अन् कांही हजारांत. शेअर होल्डर्सना त्यांचे दहा रुपयांचे शेअरवर डिव्हिडंड दूरच, मुद्दलहि परत येण्याची आशा नाही ! अर्थातच त्या सुंदर ' शास्त्रीभवना ' समोर गाडीवाल्यांचा धंदा पूर्वीपासूनच जोरात होताच – त्यात भर. कारण त्याजवळपास हॉटेलच नाही !

मद्रासप्रमाणेच स्थिति जवळजवळ बहुतेक सरकारी सोसायट्यांच्या कॅन्टिन्सची आहे. मनांत येते ते हेच की पुरीभाजी तळण्यांत देखील आमचे सरकारने नाक खुपसणे आवश्यकच आहे कां ? त्याच ' आठ आणे भाडे ' सवलती एखाद्या मलबारी केरळी कंत्राटदाराला द्या. तो सर्वांना भरपूर खायला तर देईल पण हजारोंनी पैसे कमवील. आपलेकडे असे उडपी हॉटेलवाले तसे इकडे केरळी मलबारी मोपले – मस्त बनवितात !

आतां थोडंसं विषयांतर ! ' गरीबी हटाव ' घोषणा आम्हालाही करता येतात बरं कां ? तुम्ही फक्त घोषणाच करता, आम्ही कार्यही करतो. गेल्या महिन्यांत मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस झाला. त्यांनी लोकांना हारांमध्ये पैसे घालवू नका असे सांगितले. शिवाय " पिच्चैक्कार मरूवाहळव् तिट्टम " घोषणांची कार्डे काढली – त्यावर गांधीजींचे चित्र आहे. मला वाटतं ५० पैशांना एकेक प्रमाणे ती भेटकार्डे विकून गरीबी हटविली जाणार आहे म्हणे आतां. गरीबी कुणाची हटणार ह्य प्रश्न गौण आहे. योगायोग असा कि, ह्या साध्या–वाढदिवसाच्या, वर्णनांना पार्श्वभूमी मिळाली होती, महाराष्ट्रांतील गाजलेल्या " समाजवादी विवाह समारंभाची " !! ! □ □

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## नक्षलवाद आणि बंगाली तरुणांचे भवितव्य

ह्याच शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला मजकूर वाचून बंगाली तरुणांची जी प्रतिक्रिया झाली ती मनन करण्याजोगी आहे. त्यांना निश्चित वाटतं की ही भारतीय पातळीवरील एक अतिगंभीर समस्या आहे. सुशिक्षितांमधील बेकारी हे नक्षलवादाचेच एक कारण असले तरी याचा अर्थ सगळेच सुशिक्षित बेकार तरुण (विशेषतः बंगाली) नक्षलवादी आहेत असा मात्र नव्हे. बंगाली माणसाप्रमाणे इतर राज्यातील लोकांनाही स्वतःच्या हक्कांची जाणीव असेलच. पण म्हणून त्यांनी टवाळी, गुंडगिरी व हिंसा करण्यास प्रवृत्त व्हावे असे तर नाही ना ? पण गंमत अशी की ज्यावेळी पोलिसांना बिहारमध्ये ह्या गुंडांना व नक्षलवाद्यांना पकडण्यात अपयश आले तेव्हा त्यांनी हातात सांपडतील त्या सर्व सुशिक्षित बेकारांना ते निरपराध असूनही पकडून नेले. पोलिसांचे हे कृत्य म्हणजे नक्षलवादी नसलेल्या तरुणांना जाणूनबुजून नक्षलवादाकडे वळवणंच नव्हे काय ? म्हणून प. बंगाल, बिहार व ओरिसा सरकारला आणि सरकारी पोलिस अधिकाऱ्यांना बंगाली तरुणांची कळकळीची विनंती आहे की निरपराध बंगाली (व इतरही) तरुणांच्या सुरक्षिततेकडे लक्ष पुरविले जावे आणि त्यायोगे नक्षलवादी बनणाऱ्यांवर आळा घालावा.

## देव प्रार्थना ऐकतो ?

एकदा एका वार्ताहराने बायफ्रा येथे जाण्यासाठी काढलेले विमानाचे तिकीट आदल्या दिवशी रद्द करवून घेतले. त्याचे कारण त्या रात्री प्रार्थना करीत असताना त्याचा आतला आवाज जाण्याबाबत विरोध करीत होता असे ते गृहस्थ म्हणाले. दोन दिवसांनी त्याच विमानाला अपघात झाल्याची बातमी आली. वार्ताहर महाशयांना हायसे वाटले. आपली प्रार्थना देवाने ऐकली असे त्यांचे म्हणणे.

प्रार्थनेवरील त्यांचा विश्वास खरा मानला तर देव एकाची प्रार्थना ऐकतो व दुसऱ्याची ऐकत नाही असेच म्हणावे लागेल. कारण त्याच विमानाने प्रवास करणाऱ्यांपैकी आणखी कोणीच प्रार्थना केली नव्हती असे आपण म्हणू शकतो काय ?

हेच बांगला देशच्या लोकांबाबत म्हणता येईल. लाखो लोकांचे लाखो मार्गांनी

नुकसान झाले. लाखात एक देखील माणूस प्रार्थनेला प्रवृत्त झाला नसेल का? मग ही प्रार्थना देवाने का बरे ऐकली नाही?

## परकेपणा नाहीच?

चोवीस परगण्यातील एका गृहस्थांशी गप्पा करीत असताना CPI(M) चे श्री. प्रमोद दासगुप्ता यांच्या जाहीर भाषणाचा विषय निघाला. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले होते की लवकरच आम्ही सबंध पश्चिम बंगालमध्ये हरताळ घडवून आणू व सरकार लोकांशी किती परकेपणाची वर्तणूक करते हे त्यायोगे सिद्ध करून दाखवू. श्री. प्रमोद दासगुप्तांच्या ह्या मुद्याचा मी उल्लेख करताच गप्पा मारण्यास आलेले हे गृहस्थ म्हणाले –

अहो, ' हरताळ ' आणि ' बंध ' लोकांवर जबरदस्तीने लादण्यात येतात, कारण त्यांना धाकदपटशा दाखवण्यात येतो. जर श्री. प्रमोद दासगुप्ता असे वचन देतील की त्यांच्या पार्टीच्या लोकांकडून सर्वसाधारण लोकांना दहशत व धमक्या दिल्या जाणार नाहीत–आणि ते वचन पूर्णपणे पाळले जाईल–तेव्हाच सरकार जनतेशी किती प्रमाणात परकेपणाने वागते ह्याचा अंदाज येईल व दासगुप्तांचा पक्ष कितपत लोकप्रिय आहे हे देखील दिसून येईल.

ह्या गृहस्थांचे म्हणणे श्री. प्रमोद दासगुप्तांपर्यंत पोचवावेसे मला वाटले.

## एम्परर नको; सम्राट हवा!

राज्यसभेत नुकताच एक ठराव पास झाल्याचे ऐकले की यापुढे प्रत्येक सरकारी कागदपत्रांवर प्राइम मिनिस्टर ह्या शब्दाबरोबर कंसात ' प्रधानमंत्री ' ही अक्षरे देखील लिहिण्यात यावीत.

एअर इंडियाच्या ' बोइंग ७४७ ' ला एम्परर अशोक हे नाव दिले गेले तेव्हा मात्र हिंदी भाषेच्या अभिमानी लोकांपैकी एकजणसुद्धा ह्या नावाला हरकत घेण्यास पुढे सरसावला नाही. वास्तविक त्यांनी अशीच मागणी करायला हवी होती की ' एम्परर अशोक ' ह्या शब्दाबरोबर कंसात ' सम्राट अशोक ' अशी अक्षरे लिहावीत म्हणून !

## बिच्चारा!!

हावऱ्याची गोष्ट. एक बस माणसांनी खच्चून भरली होती. एक सैन्यातला शिपाई धावत धावत येऊन चालत्या बसमध्ये चढला मात्र आणि ताबडतोब ती बस थांबली. सर्व उतारू भराभर खाली उतरले. बस रिकामी झाली. बस ड्रायव्हर

आणि कंडक्टरदेखील पळून गेले. कारण काय? ... त्या शिपायाच्या अंगावर बंदुकीच्या गोळ्या लागल्याच्या खुणा व चाकूचे वार स्पष्ट दिसत होते, हेच कारण. बसच्या आश्रयाला आलेला शिपाई बिचारा एकटाच बेशुद्धावस्थेत पडून राहिला.

चौकशीअंती कळले की तो शिपाई त्या दिवशी सुटीवर होता. सायंकाळी एका चहाच्या दुकानात मित्रांबरोबर चहा पिण्यासाठी तो गेला असताना एकदमच काही तरुण आत घुसले. त्यांनी बंदुकीच्या गोळ्या झाडल्या व चाकूचे वार केले. हा मारा चुकवीत चुकवीत तो हॉटेलच्या बाहेर पडला व समोर दिसेल त्या वाहनात आश्रयासाठी चढावे ह्या हेतुने धावत्या बसमध्ये उडी घेतली. आत चढताच तो बेशुद्ध झाला. फार वेळानंतर कोणीतरी त्याला दवाखान्यात पोचवले.

## शेष थेके शुरू

ऑफिसमधील एक सुपरिंटेंडेंट कधीही काळा चष्मा वापरीत नसत. पण त्यांच्या डोळ्यांना एक दिवस काळा चष्मा दिसला. लोकांना कुतुहल वाटलं. सारेजण त्यांच्याभोवती जमा झाले. सुपरिंटेंडेंटसाहेबांनी लागलीच हात पसरून म्हटले– 'जय बांगला.' अभावितपणे लोक चार पावले दूर सरकले. पण खूप हशा पिकला. कोणीतरी म्हटले, 'अहो, 'जय बांगला' तर आता आटोपला आहे.' यावर सुपरिंटेंडेंट लागलीच उत्तरले–'शेष थेके शुरू.' आणि हास्य अधिक जोराने खळखळले !

मे महिन्यात कलकत्त्यात सगळीकडे कसलीतरी अभूतपूर्व अशी नेत्ररोगाची साथ पसरली होती. कोणीतरी तिला जय बांगला नाव दिले आणि मग त्याच नावाने ती लोकप्रिय (?) झाली. वास्तविक ह्या नावात काही अर्थ नव्हता. मुंबईकडून ती साथ कलकत्त्यात आली असं वर्तमानपत्रांनीच सांगितलं. आता ती साथ संपत आल्यानंतर सुपरिंटेंडेंटसाहेबांवर तिने हल्ला केला म्हणून इतरांना नवल वाटलं. साहेबांचं उत्तर मोठं मार्मिक होतं. शेष थेके शुरू म्हणताना त्यांनी सुचवलं की, शेवटी हा रोग झालाय, याचा अर्थ कदाचित इथूनच पुन्हा नव्याने सुरुवात झाली असावी !

ह्या बाबतीत एका सरकारी नोकराने तक्रार केली की, हा जय बांगला नेत्ररोग संसर्गजन्य असूनही सरकारने तसे जाहीर केले नाही. एवढेच नव्हे, त्याचा तडाखा बसणारांना सुटीही मिळत नाही. नेत्ररोग झालेली माणसे काम करू शकत नाहीत. तरीही ऑफिसमध्ये येऊन बसतात अन् त्यांच्या संपर्कात आलेल्यांमध्ये रोग फैलावण्याची भिती असते. सरकारने अशा वेळी नेत्ररोगाने पछाडलेल्या लोकांना सुटी नको का द्यायला ?

□ □ □



# गरिबी हटाव आणि प्रा. दांडेकर

गेल्या दोन वर्षांत ' गरिबी हटाव 'ची घोषणा बरीच रूढ झाली आहे. गरिबी हटविण्याची समस्या किती गंभीर आहे व त्यासाठी काय उपाययोजना केली पाहिजे यावर विचारमंथन मात्र फारसे झालेले नाही. ही उणीव भरून काढण्याचा प्रा. वि. म. दांडेकर यांनी प्रयत्न केला हे जरूर स्वागतार्ह आहे. गरीब कुणाला म्हणायचे, त्यांचे एकूण लोकसंख्येत किती प्रमाण आहे व गेल्या वीस बावीस वर्षांच्या नियोजनानंतरही त्यांची स्थिती न सुधारता अधिकाधिक बिघडत कशी चालली आहे याचे वर्णन प्रा. दांडेकरांनी भरपूर आकडेवारी देऊन केले आहे. काही तज्ज्ञांच्या मते ही आकडेवारी पूर्णतया विश्वासार्ह नसली तरी दारिद्र्याची बरी-चशी स्पष्ट कल्पना हिच्यावरून येऊ शकते. प्रा. दांडेकरांचे अंदाज असलेच तर माफक आहेत, भडक नाहीत. म्हणजे दारिद्र्याची वस्तुस्थिती ते वर्णन करतात त्यापेक्षाही अधिक भयानक असेल. ते काही असो, प्रा. दांडेकरांनी घडविलेले ' दारिद्र्य दर्शन 'सुद्धा अनेकांची झोप उडविणारे आहे.

वाचकांची झोप उडवावी एवढाच काही प्रा. दांडेकरांचा उद्देश नाही. गरिबी हटविण्यासाठी कुठली परिणामकारक उपाययोजना करता येईल याबाबत विविध पर्यायांची चर्चा करून त्यांनी एक योजनाही पुढे मांडली आहे. त्यांच्या प्रतिपादनाचे सार त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणे आहे : ' देशातील दारिद्र्य नष्ट करण्याकरता वारंवार सुचविल्या जाणाऱ्या दोन उपायांचा आपण येथवर विचार केला. ते म्हणजे उपलब्ध शेत जमिनीचे आणि ग्रामोद्योगांच्या रूपाने उपलब्ध भांडवलाचे विस्तृत वाटप. हे दोन्ही उपाय व्यवहार्य नाहीत. शिवाय त्यांची हट्टाने अंमलबजा-वणी केलीच तर त्यांनी देशातील दारिद्र्य तर नष्ट होत नाहीच उलट देशाचा आर्थिक विकासच धोक्यात येतो हे आपण पाहिले. अशा परिस्थितीत ज्यांच्यापाशी निर्वाहक्षम शेती नाही किंवा निर्वाहक्षम उत्पादनाचे अन्य साधनही नाही त्यांचे

गरीबी हटवण्याच्या घोषणेला प्रा. दांडेकर
मनानी प्रामाणिक असले तरी त्यांच्या प्रतिपादनामुळे
गरिबी वाढवण्यालाच ते पाठिंबा देत आहेत
असे म्हणावे लागते.

## पन्नालाल सुराणा

दारिद्र्य कसे नष्ट करावयाचे हा प्रश्न आहे. या लोकांपाशी उत्पादनाचे साधन म्हणजे त्यांचे फक्त दोन हात आहेत. त्यांना निर्वाहक्षम रोजगारी देणे हाच त्यांच्या दारिद्र्यावर एकमेव उपाय आहे. ' (पृ. ४३)* .

या दृष्टिकोनातून त्यांनी रोजगार हमी योजना सुचविली आहे. ग्रामीण भागात तळचे पन्नास टक्के लोक गरीब आहेत. त्यांच्याजवळ निर्वाहक्षम शेत जमीन किंवा उत्पादनाचे अन्य साधन नाही. त्यापैकी निदान वीस टक्के लोकांना रस्ते, पाट-बंधारे वगैरेसारख्या योजनांवर रोजगार पुरविण्याची आखणी करावी, त्यासाठी दरसाल सुमारे रु. ८०० कोटींची मजुरी देता येईल इतकी कामे काढावीत अशी प्रा. दांडेकरांची सूचना आहे.

आजची बेकारीची तीव्रता पाहता रोजगार वाढविण्याच्या कुठल्याही कल्पनेचे स्वागत केले पाहिजे. त्या दृष्टीने दारिद्र्य निवारण्यासाठी एक योजना या भूमिके-तून प्रा. दांडेकरांनी आपली कल्पना मांडली असती तर ते योग्य झाले असते. पण तो दारिद्र्यनिवारण्याचा एकमेव उपाय आहे असे त्यांनी म्हटले आहे. आपली योजना इतरांच्या गळी उतरविण्यासाठी कुशल विक्रेत्याच्या धाटणीवर त्यांनी हा शब्द वापरला असता तरी त्याकडे दुर्लक्ष करता आले असते. पण प्रा. दांडेकरांना स्वतःची योजना जितक्या हिरीरीने मांडावयाची आहे तितक्याच आग्रहाने शेत जमिनीचे फेरवाटप व कमी भांडवलाच्या सहाय्याने उद्योगधंद्यात अधिक लोकांना रोजगार पुरविणे या उपायांना विरोध करावयाचा आहे. हे सर्व उपाय निरर्थकच नव्हेत तर हानिकारक आहेत असे प्रा. दांडेकरांचे म्हणणे आहे. म्हणून प्रा. दांडे-करांच्या रोजगार-हमी-योजनेच्या तपशिलाची चर्चा करण्यापूर्वी त्यांचा हा दृष्टि-

* प्रा. दांडेकरांचा हा व पुढील उतारे माणूसच्या 'गरिबी हटाव' योजना विशेषांकातून (३१ मार्च १९७१) घेतलेले आहेत. पृष्ठ क्रमांक त्या अंकातले आहेत.

कोन तपासून पाहणे आवश्यक आहे.

दारिद्र्याची कारणे कोणती, याची तात्विक चर्चा प्रा. दांडेकरांनी केलेली नाही. त्यांच्या मांडणीवरून असे दिसते की निर्वाहक्षम रोजगाराचा अभाव हेच दारिद्र्याचे एकमेव कारण आहे. उत्पादन साधनांची विषम वाटणी, त्यामुळे श्रमिकांना त्यांच्या श्रमाचा मोबदला योग्य प्रमाणात न देण्याची व त्यांच्या जवळ असलेली तुटपुंजी उत्पादन साधनेसुद्धा हिरावून घेण्याची धनिकशहांच्या हाती असलेली ताकद दारिद्र्य निर्माण होण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे, असे दांडेकर मानत नाहीत. गंमत अशी की, इतरांवर टीका करताना प्रा. दांडेकर विषमता या घटकाचा युक्तिवादा-साठी उपयोग करतात. उदाहरणार्थ, पान दहावर त्यांनी म्हटले आहे, ' नियोजन मंडळाने त्याकडे दुर्लक्ष करून आर्थिक विकासाचे लाभ श्रीमंत, गरीब सर्वांना-सारखे मिळतील असे अंधपणे मानले आहे आणि दारिद्र्याचा आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून वाढणाऱ्या विषमतेचा सारा प्रश्नच दृष्टीआड केला आहे. '

भाववाढ हेहि दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण आहे आणि म्हणून भाववाढ रोखून धरणे हा वरवर नकारात्मक वाटला तरी दारिद्र्य निवारण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे, किमान पक्षी दारिद्र्य निवारण्याच्या समग्र उपाय योजनेचा भाववाढ निरोध हा एक अविभाज्य भाग आहे असे कोणीही मान्य करील. खुद्द प्रा. दांडेकरही पान ५९ वर ते मान्य करतात. मजुरांच्या हातात पडणाऱ्या नगद मजुरीची खरी किंमत भाववाढीमुळे कमी कशी होते याचे विवेचन करून ते म्हणतात, ' तात्पर्य बेकारांना रोजगार देऊन निर्वाहक्षम मजुरी देण्याकरता पैसा पाहिजेच परंतु दिलेल्या मजुरीतून गरिबांचा निर्वाह भागवयाचा असेल तर गरिबांच्या जीवनास आवश्यक त्या वस्तूंचा पुरेसा पुरवठाही बाजारात उपलब्ध झाला पाहिजे. देशातील बेकारी नष्ट करण्याच्या, गरिबी हटविण्याच्या बुडाशी हीच मूलभूत अडचण आहे. ' (' च ' काराची बाधा प्रा. दांडेकरांनाही झालेली दिसते. शिवाय आता जीवनावश्यक वस्तूंचा पुरेसा पुरवठा होणे ही ' मूलभूत ' अडचण त्यांना वाटू लागली तर यापूर्वी पुरेसा रोजगार उपलब्ध नसणे हीच मूलभूत अडचण आहे असे त्यांनी मांडले आहे.)

भाववाढ हे जर गरिबी निर्माण होण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे, तर त्यावर काही उपाय न सुचवता केवळ रोजगार हमी हाच दारिद्र्य निवारण्याचा एकमेव उपाय होय असे म्हणणे कितपत योग्य आहे ?

**प्रा. दांडेकरांच्यासारखी आपली फसगत होऊ नये म्हणून दारिद्र्याची कारणे आपण क्रमवार पाहू.**

दारिद्र्य ही कल्पना एका अर्थी सापेक्ष आहे. काहीजण श्रीमंत आहेत, त्यांच्या तुलनेने समाजातील बाकीचे लोक गरीब आहेत असे दिसते. पण गरिबीची निरपेक्ष कल्पना करणेही शक्य आहे. माणसाला माणसासारखे जीवन जगता यावे यासाठी



भाववाढ हे दारिद्र्याचे मुख्य कारण

त्याच्या (व त्याच्या कुटुंबियांच्या) प्राथमिक गरजा बऱ्यापैकी भागल्या गेल्या पाहिजेत. गरजा भागविण्यासाठी काही वस्तू (अन्न, कपडा इ.) व काही सेवा (शिक्षण, वैद्यकीय मदत इ.) काही विशिष्ट प्रमाणात त्याला मिळाल्या पाहिजेत. हे प्रमाण आरोग्यशास्त्र व इतर काही गोष्टी यांच्या सहाय्याने ठरवता येते. हे प्रमाण आदर्श काय असावे, हे ठरविता येते, तसे किमान काय असावे हेही ठरविणे शक्य आहे.

या किमान पातळीवर वस्तू व सेवा ज्या प्रमाणात उपलब्ध झाल्या पाहिजेत त्याला आपण किमान जीवनमान म्हणू शकतो. ज्या व्यक्तींना किंवा कुटुंबांना हे किमान जीवनमान उपलब्ध होत नसेल ते गरीब होत. ही गरिबीची निरपेक्ष व्याख्या म्हणता येईल.

जीवनमान कसे उपलब्ध होते? आज घडीला बाजारपेठेत जाऊन आवश्यक त्या वस्तू व सेवा खरीदणे हाच जीवनमान उपलब्ध करून घेण्याचा मार्ग होय. या खरेदीसाठी हातात पैसा किंवा क्रयशक्ती पाहिजे. आज समाजात असे दिसते की, काहीजणांच्या हातात हा पैसा मुबलक प्रमाणात येतो. ज्यांच्याजवळ शेतजमीन, घर, जागा असे काही साधन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे त्यांना स्वतः श्रम न करतासुद्धा व्याज, भाडे, खंड वगैरे मार्गांनी भरपूर उत्पन्न मिळत रहाते. इथेच पहिला फरक जाणवतो. तो असा की, काहीजणांना भरपूर संपत्तीवर मालकी असल्याने श्रम न करताही भरपूर उत्पन्न मिळू शकते व जीवनमान आदर्शाच्या पलीकडचेसुद्धा उपभोगता येते.

समाजातील बहुसंख्य लोकांना स्वतःचे श्रम विकणे हेच उत्पन्न मिळविण्याचे साधन असते. त्यामुळे ज्यांचे श्रम विकले जात नाहीत म्हणजेच जे बेकार आहेत त्यांना उत्पन्नाच्या अभावी किमान जीवनमान मिळू शकत नाही. नातेवाईकांच्या मेहेरबानीवर त्यांना जगावे लागते.

ज्यांचे श्रम विकले जातात त्यांना किमान जीवनमान मिळवता यावे इतके उत्पन्न मिळतेच असे नाही. त्यांना कमी उत्पन्न मिळण्याची दोन कारणे संभवतात. एकतर त्यांची उत्पादनक्षमता कमी असेल किंवा त्यांना कमी मजुरी देऊन कुणीतरी त्यांचे शोषण करीत असेल. उत्पादनक्षमता ही श्रमिकाच्या वैयक्तिक कार्यक्षमतेवर आणि कसबावर काही अंशी अवलंबून असते, पण महत्त्वाचा भाग उत्पादनतंत्राचा व हत्यारे किंवा साधने यांचा असतो. ती जर अगदी प्राथमिक स्वरुपाची असतील तर उत्पादनक्षमता कमी राहील. उत्पादनतंत्र व साधने पुरेशी उत्पादनक्षम असण्यासाठी भांडवलाची गरज आहे. पण याचा अर्थ भांडवल जितके जास्त तितकी उत्पादनक्षमता जास्त असा मात्र नाही. पुरेशी उत्पादनक्षमता साध्य करण्यासाठी भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण किती असले पाहिजे हे वेगवेगळ्या धंद्यात तंत्रविज्ञानाच्या सहाय्याने व इतर गोष्टींचा विचार करून ठरविता येते.

श्रमिकांची उत्पादनक्षमता जेवढी असेल तेवढे उत्पन्न मजुरीच्या स्वरुपात त्याला मिळते असा एक समज आहे. वास्तविक परपरागत अर्थशास्त्राच्या सिद्धांतानुसार-सुद्धा असे आहे की मजुरी ही उत्पादनक्षमतेइतकी देण्याकडे एकूण श्रमबाजारपेठेचा कल असतो, पण व्यवहारात उत्पादनक्षमतेइतकीच मजुरी दिली जाते असे नाही. काही वेळा उत्पादनक्षमतेपेक्षा मजुरी जास्त दिली जाते. (भारतातील बहुतेक सर्व सरकारी नोकरांबाबत हे म्हणता येईल. त्याचे कारण त्यांची अडवणूक करण्याची संघटित शक्ती जास्त आहे.) पण समाजातील, विशेषत: भारतासारख्या अप्रगत देशातील बहुसंख्य श्रमजिवी वर्गाची अशी ताकद नाही. त्यामुळे उत्पादनक्षमतेपेक्षा मजुरी जास्त मिळणे तर शक्यच नाही. बहुतेकजणांच्या बाबतीत मजुरी ही उत्पादनक्षमतेपेक्षा बरीच कमी दिली जाते. त्याचे कारण उत्पादनसाधनांचे मोजक्या व्यक्तींच्या हाती (मालकी हक्कामुळे) झालेले केंद्रीकरण होय. यालाच शोषण म्हणतात. उत्पादनसाधनांच्या विषम वाटणीमुळे श्रमिकांच्या मजुरीची लूट करणे धनिकशहांना शक्य होते. ही कार्ल मार्क्सची मांडणी त्याज्य मानण्याचे काहीच कारण नाही. मार्क्सचे बाकीचे सिद्धान्त कुणाला मान्य नसले तरी या मांडणीबाबत कसलाही पूर्वग्रह ठेवण्याचे कारण नाही. या शोषणामुळे अनेक श्रमिकांना त्यांचे श्रम विकले जाऊनसुद्धा पुरेसे उत्पन्न व पर्यायाने किमान जीवनमान मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. या अर्थाने उत्पादनसाधनांच्या मालकीतील विषमता हे गरिबीचे एक महत्त्वाचे कारण आहे; एवढेच नव्हे तर त्याचे एक गतीशास्त्रही आहे. शोषणामुळे विषमता व विषमतेमुळे अधिक शोषण असे हे दुष्ट चक्र वाढत्या गतीने फिरू लागते. गोरगरिबांच्या हाती असलेली उत्पादनाची तुटपुंजी साधने त्यांच्या हातून हिसकावून घेणे धनिकशहांना शक्य होते. याचे एक उदाहरण प्रा. दांडेकरांनीच पान तेरावर दिले आहे. "...सावकार आणि मोठे जमीनमालक यांजकडून त्यांची पिळवणूक होऊ लागली. अशा रीतीने जमीनदारी पद्धतीप्रमाणे रयतवारी पद्धतीतही प्रत्यक्ष शेती कसणाऱ्याच्या जीवावर जगणारा एक ऐतखाऊ वर्ग निर्माण झाला."

स्वातंत्र्यपूर्व काळात जसे हे घडत होते तसे स्वातंत्र्योत्तर काळातही घडत आहे. सावकार आणि मोठे जमीनमालक यांनी छोटया शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्याची प्रक्रिया वाढली आहे. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात मक्तेदार भांडवलदारांनी छोटया कारखानदारांना गिळंकृत करायचे अशीही प्रक्रिया चालू असल्याचे मोनॉपॉलिज् कमिशनच्या अहवालावरून दिसून येते.

धनिकशहांना श्रमिकाचे शोषण आणखीही काही मार्गांनी करता येते. कर्जबाजारीचे प्रमाण छोटे शेतकरी व शेतमजूर यांच्याबरोबरच शहरातील संघटित व असंघटित कामगार वर्ग यांच्यातही भरपूर आहे. बहुतेक ठिकाणी सरकारी नियंत्रणाबाहेरील सावकारी मोठ्या प्रमाणात आहे व त्यात व्याजाचे दर भरमसाठ


आहेत. शोषणाचा आणखी एक मार्ग म्हणजे घाऊक व्यापार. सुगीच्या दिवसात छोटया शेतकऱ्यांचा माल पडत्या भावाने खरेदी करायचा आणि शहरी गिऱ्हाईकाला तो जास्त भावाने विकायचा. बडया व्यापाऱ्यांना हे शक्य होते. याचे कारण त्यांच्या हातात असलेला मुबलक पैसा होय. या प्रक्रियेत छोटया शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमांची व व्यवस्थापनाची योग्य किंमत न मिळणे या अर्थाने शोषण होते. आणि अपुरे उत्पन्न मिळाल्याने त्यांना किमान जीवनमान उपभोगता येत नाही. हा त्याचा परिणाम होतो. म्हणजे संपत्तीची विषम वाटणी व त्यामुळे धनिकशहांच्या हाती केंद्रित होणारी अर्थसत्ता हे गरिबी निर्माण करण्याचे व वाढविण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

श्रमिकांनी आपले श्रम विकूनसुद्धा त्यांना किमान जीवनमान उपलब्ध न होण्याचे शेवटचे कारण भाववाढ हे होय. मजुरी मिळण्यात शोषण झाले नाही तरीसुद्धा बाजारभाव एकदम वाढल्याने हातातील नगद उत्पन्नाचे खरे मूल्य कमी होणे हे गरिबांच्या गरिबीचे तितकेच महत्त्वाचे कारण होय. भाववाढ ही बडया व्यापाऱ्यांच्या साठेबाजीमुळे होऊ शकते; तशीच तुटीच्या अर्थभरण्यासारख्या सरकारच्या चुकीच्या धोरणामुळेही होऊ शकते.

दारिद्र्य–निवारण्याच्या या विविध मार्गांचे स्वरूप एका साध्या उदाहरणाने स्पष्ट करता येईल. घागर भरण्यासाठी तिच्यात वरून नळ सोडणे जसे व जितके आवश्यक आहे तितकेच त्या घागरीला असलेली भोके बुजविणे आवश्यक आहे. जीवनमानरूपी घागर भरायची तर वरून रोजगाराची धार सोडण्याबरोबरच भाववाढ, सावकारी, विषमता, शोषण ही भोके बुजविणे आवश्यक आहे.

## चतुर्विध कारणे

म्हणजे १ : बेकारी, २ : धनिकशहांकडून विविध मार्गांनी होणारे शोषण ३ : संपत्ती व विशेषत: उत्पादनसाधनातील विषमता व श्रम न करता उत्पन्न मिळण्याची व्यवस्था, आणि विविध कारणांनी होणारी भाववाढ ही गरिबीची चतुर्विध कारणे दिसतात. गरिबी हटविण्यासाठी या चारही दिशांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. केवळ एकाच दिशेने प्रयत्न करून भागेल असे मानणे चूक आहे. भाववाढ रोखणे हा नकारात्मक भाग होय. रोजगार वाढविणे हा भरीव कार्यक्रम होय आणि शोषण व विषमता नष्ट करणे हा आजची गरिबी हटवण्याचा काही प्रमाणात व उद्याची गरिबी निर्माण होऊ न देण्याचा महत्त्वाचा उपाय होय. केवळ रोजगार वाढविला आणि इतर उपाय योजले नाहीत तर गरिबी हटेल याची शाश्वती नाही. याचा अर्थ कुठल्या एका दिशेने प्रयत्न करू नये किंवा त्यात मोडता घालावा असा नाही. पण त्याचबरोबर यापैकी एक मार्ग म्हणजेच संजीवनी मंत्र होय आणि इतर मार्ग विषवत् होत असे म्हणणेही असमंजसपणाचे आहे.



छोटे शेतकरी व भूमिहीन शेतमजूर यांना जमिनीचा तुकडा मिळाला पाहिजे...

या दृष्टीने प्रा. दांडेकर यांनी आपल्या प्रतिपादनात सुधारणा करण्याची गरज आहे.

शेतजमिनीच्या फेरवाटपाबाबत प्रा. दांडेकरांनी केलेले विवेचन अतिशय सदोष आणि विसंगतीने भरलेले आहे. त्यांची साधी प्राथमिक चूक अशी झाली आहे की, फेरवाटप हा रोजगार वाढविण्याचा मार्ग होय अशी फेरवाटपवाद्यांची आग्रही भूमिका असल्याची त्यांनी समजत करून घेतली आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या सर्व लोकांना म्हणजेच सर्व छोटे शेतकरी व भूमिहीन शेतमजूर यांना जमिनीचा तुकडा मिळाला पाहिजे, मग तो कितीका लहान असेना, अशी फेरवाटपवाल्यांची भूमिका आहे असे ते गृहीत धरतात. पृष्ठ सव्वीस-सत्तावीसवरील, तसेच पान अठ्ठावन्न-वरील त्यांच्या विवेचनावरून ही समजूत दृढमूल होते. त्यांची दुसरी एक ढोबळ चूक अशी झाली आहे की, जमिनीचे फेरवाटप करावे असे म्हणणारे हे सगळे एकाच विचाराचे लोक आहेत व नियोजन मंडळ हे त्यांचे प्रतिनिधी होय असे ते मानतात. फेरवाटपाचा पूर्वपक्ष मांडताना त्यांनी फक्त नियोजन मंडळांची मते उद्धृत केली आहेत, हे योग्य नाही. नियोजन मंडळ हे सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे बऱ्याच अंशाने प्रतिनिधित्व करते असे म्हणता येईल. पण त्या शिवाय किंबहुना त्यांना विरोध

करणारे काही राजकीय पक्ष व काही अर्थशास्त्रज्ञ फेरवाटपाचा आग्रह धरीत आहेत. प्रा. दांडेकरांनी त्यांच्या मतांची दखलच घेतली नाही.

नियोजन मंडळाची जी मते प्रा. दांडेकरांनी उद्धृत केली आहेत त्यावरूनसुद्धा स्पष्ट होते की पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात 'फेरवाटपाला नियोजन मंडळाचा मूलतःच आधार होता.' (पान वीस) पण पुढे हे धोरण बदलले आणि पुढील शब्दात मांडले गेले. 'मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतीवर कमाल मर्यादा घालून त्यायोगे मिळणारी जमीन भूमिहिनांना वाटून द्यावी किंवा अनिर्वाहक्षम लहान लहान शेतकऱ्यास देऊन त्यांना निर्वाहक्षम करावे हाच जर कमाल मर्यादा घालण्याचा हेतु असेल तर वस्तुस्थिती पाहता त्यातून प्रत्यक्षात काही साधू शकेल असे वाटत नाही. म्हणून जमिनीचे फेरवाटप हे कमाल मर्यादा घालण्याचे उद्दिष्ट होऊ शकत नाही. कमाल मर्यादा घालण्याचे समर्थन अन्य सर्व सामान्य तत्वावर आधारले पाहिजे. ते असे की जमीन वा अन्य मालमत्तेवर कमाल मर्यादा घालणे हे सामान्य लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. या सामान्य भूमिकेवरून आम्हास जमिनीवर कमाल मर्यादा घालण्याचे धोरण मान्य आहे.'

पुढे नियोजनमंडळ म्हणते, 'देशाच्या सांप्रत परिस्थितीत संपत्ति व उत्पन्न या बाबतीतील विषमता आर्थिक प्रगतीशी विसंवादी आहे, ही गोष्ट सर्व क्षेत्रांस लागू आहे. पुरोगामी ग्रामीण व्यवस्था प्रस्थापित करावयाची तर जमिनीच्या मालकीतील विषमता कमी केली पाहिजे......सध्याच्या शेतजमिनीच्या वाटपाचे स्वरूप लक्षात घेता जमीनमालकीवर कमाल मर्यादा घालून फेरवाटपाकरता फारशी जमीन उपलब्ध होण्याचा संभव नाही. तरीसुद्धा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अवधीत या दिशेनें निश्चित पावले टाकणे अगत्याचे आहे.'

म्हणजे ताबडतोबीने नवा रोजगार उपलब्ध करून देणे यासाठी नव्हे तर विषमता कमी करण्यासाठी कमाल मर्यादा बसवावी अशी नियोजनमंडळाची भूमिका होती. १९६१ ते ७० या काळात विविध राज्यात नियोजनमंडळाच्या सल्ल्यानुसार कमाल मर्यादा कायदे झाले: आंध्रात २७ ते ३२४ एकर, महाराष्ट्रात १८ ते १२६ एकर, गुजरातेत १९ ते १३२ एकर, म्हैसूरात २७ ते २१६ एकर अशा मर्यादा घालण्यात आल्या. फेरवाटपासाठी पुरेशी जमीन उपलब्ध होणार नाही असे नियोजन मंडळाला वाटत होते त्याचे कारण उत्पादनक्षमतेला बाध येऊ नये म्हणून कमाल मर्यादा बरीच वरची ठेवली पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन होता. भारतातील समाजवाद्यांना तो तेव्हाही मान्य नव्हता. त्यानंतर झालेल्या शेती संशोधनाने तर समाजवाद्यांच्या मताला पुष्टीच मिळाली आहे. **थोड्या जमिनीवर सघन पद्धतीने जास्तीत जास्त उत्पादन** काढणे हा अलीकडील शेती तंत्राचा रोख आहे. संकरित बियाणे, अधिक सघन मशागत, उपलब्ध पाण्याचा पुरेपूर वापर वगैरे गोष्टींमुळे व अवजड यांत्रिकीकरणाच्या वाटेला न जाता थोड्या जमिनीत उत्पादन

वाढविणे शक्य झाले आहे. म्हणून विषमता कमी करण्याच्या दृष्टीने कमालमर्यादा बरीच खाली आणावी असे संसोपाचे म्हणणे आहे. त्यामुळे उत्पादनवाढीला बाध न येता उलट आज दुसऱ्याच्या शेतावर राबणाऱ्या बहुसंख्य कसणाऱ्यांना स्वतःची शेती झाल्याने उत्पादनवाढीची प्रेरणा मिळून व सघन पद्धतीला प्रोत्साहन मिळून उत्पादनवाढीची गति वाढेल असे वाटते. या संदर्भात संसोपाच्या महाराष्ट्र शाखेच्या बार्शी येथे २८ ते ३० डिसेंबर १९६९ रोजी झालेल्या अधिवेशनातील ठराव उद्धृत करणे उपयुक्त ठरेल.

## संसोपाचा ठराव

' महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात शेतजमिनीच्या मालकीतील विषमता वाढली आहे. १९५६ ची कूळकायदा दुरुस्ती व १९६१ चा कमालधारणा मर्यादा कायदा यात अनेक उणिवा व पळवाटा राहिल्या होत्या. त्यामुळे बड्या शेतमालकांनी आपण जमीन सरकार जमा होऊ नये यासाठी विविध युक्त्या योजल्या, उपरोक्त कायद्याची अंमलबजावणीही अतिशय सदोष पद्धतीने झाली. त्यामुळे भ्रष्टाचार वाढला. काही छोट्या कुळांना व भूमिहीन शेतमजुरांना कायम वहिवाटीसाठी जमिनी मिळाल्या असल्या तरी दलीतवर्गीय शेतमालकांची जमीन बड्या शेतकऱ्यांकडे खंडाने होती, ती बड्यांच्या मालकीची झाली अशी विपरीत उदाहरणेही भरपूर आहेत. हे एका बाजूने होत असताना दुसरीकडे दारिद्र्यामुळे अनेक छोट्या शेतमालकांना जमिनी विकाव्या लागल्या असून त्या बडे शेतकरी व बडे कारखानदार व्यापारी यांनी विकत घेतल्या आहेत. शेतकऱ्यांपैकी तळच्या २० ते ३० टक्के शेतकऱ्यांना आपल्या जमिनी कमी अधिक प्रमाणात गमवाव्या लागल्या असून वरच्या दोन टक्के शेतकऱ्यांच्या जमिनी मात्र प्रमाणाबाहेर वाढल्या आहेत. निम्यापेक्षा अधिक शेतकऱ्यांकडे अवघी साडेसात टक्के जमीन आहे; असें खुद्द सरकारी आकडेवारीच सांगते—याचे फार धोकादायक स्वरुपाचे आर्थिक, सामाजिक व राजकीय परिणाम झाले आहेत. सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित व खानदानी मानल्या गेलेल्या बड्या शेतकऱ्यांच्या हाती जमिनीचे केंद्रीकरण होऊ लागल्याने ग्रामीण सावकारी व व्यापार यांच्यातील त्यांचे स्थान व प्रभाव वाढला आहे. जुन्या रूढी, समजुती व निष्ठा कायम ठेवणे बड्या शेतकरी वर्गाच्या हिताचे असल्याने सामाजिक अभिसरणाला तो विरोध करू लागला आहे. निवडणुकीच्या आखाड्यात तो प्रभावी ठरत असल्याने व सत्ताधारी काँग्रेस पक्षाने त्याला आपला प्रतिनिधी व पुढारी मानल्याने शेती विकासासाठी आखलेल्या बहुतेक योजनांचा फायदा तो घेतो आहे...छोट्या शेतकऱ्यांना घेऊ देत नाही, त्यामुळे मूठभर लोकांच्या शेतात हरित क्रांती होऊन त्यांच्या घरावर सोन्याची कौले चढत असली तरी बहुसंख्य शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे जीवन उध्वस्त होत चालले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेली भीती खरी ठरत असून ग्रामीण भागात सामाजिक व आर्थिक अन्यायाचे साम्राज्य पसरले आहे.

संयुक्त सोशॅलिस्ट पार्टीचे असे निश्चित व पूर्ण विचारांती बनलेले मत आहे की, या पेचप्रसंगावर मात करण्यासाठी शेतजमिनीचे क्रांतिकारक फेरवाटप केले पाहिजे. बारमाही बागाईत पाच एकर, हंगामी बागाईत दहा एकर व दर एकरी सरासरी वार्षिक तीनशे रुपयांचे उत्पन्न देऊ शकेल अशी जिराईत वीस एकर (जिराईत शेतीतील प्रतवारीमुळे पडणारा फरक लक्षात घेऊन वार्षिक उत्पादनाचा वर उल्लेखिलेला निकष प्रमाण मानून त्या त्या प्रदेशात व त्या त्या प्रतवारीतील प्रमाण ठरविले जाईल.) ही कमालधारण मर्यादा ठरवून सर्व शेतजमिनीचे फेरवाटप केले पाहिजे. बहुतेक छोटे शेतकरी व भूमिहीन शेतमजूर यांना चार ते पाच एकरांचे किमानधारण क्षेत्र उपलब्ध करून देता येईल अशा प्रकारचे फेरवाटप तडकाफडकी अंमलात आणण्यासाठी आजच्या महसूल खात्यापासून स्वतंत्र असलेली, थेट मंत्रिमंडळाला जबाबदार असलेली यंत्रणा उभारली जावी. अंमलबजावणी करताना तीन अधिकाऱ्यांच्या मंडळाला जागेवर आवश्यक ते सर्व निर्णय घेण्याचे अधिकार असावेत. शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि कारागीर यांच्या प्रतिनिधींना सल्लागार मंडळावर निवडण्यात यावे.

असे क्रांतिकारक फेरवाटप केल्याने आजची सामाजिक व आर्थिक कोंडी फोडता येईल. परंपरेने दलित वा कनिष्ठ मानल्या गेलेल्या जाती-जमातींना स्वतंत्र आर्थिक आधार उपलब्ध झाल्याने सामाजिक समानतेच्या दिशेने वाटचाल करता येईल. तसेच मूठभर प्रगतीशील शेतकऱ्यांना कृषिपंडित बनविण्याऐवजी सर्वसाधारण लहान शेतकऱ्यांची उत्पादनक्षमता वाढविणे अत्यावश्यक व शक्य होईल. प्रत्येक कुटुंबाला आपल्या शेतीत पुरेसा रोजगार उपलब्ध व्हावा, राष्ट्रीय न्यूनतम जीवनमानाइतके उत्पन्न त्याला मिळावे, विकसनशील अर्थव्यवस्थेची, अन्नधान्याची व कच्च्या मालाची वाढती गरजही भागावी या दृष्टीने १ : जलसिंचनाच्या छोट्या योजनांची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करणे. आणि २ : सघन मशागत पद्धतीनुसार अवजारे, तंत्रपद्धती यात सुधारणा करणे—या दिशेने शेती सुधारण्याच्या कार्यक्रमाची वाटचाल करावी यासाठी आवश्यक ते भांडवल व साधनसामुग्री, मालमत्ता मालकीवर आधारलेल्या पतीचा विचार न करता गरज असलेल्या सर्व छोट्या शेतकऱ्यांना पुरविण्याची व्यवस्था शासनाने करावी. असे करण्यासाठी पुरेसा राजकीय रेटाही वाढवून शासनाला भाग पाडता येईल. शेतकऱ्यांच्या मालाला किंमत योग्य प्रमाणात बांधून देण्याचा प्रश्नही यामुळे धसाला लावता येईल.

अशा पद्धतीने फेरवाटप केले तरी सर्व छोटे शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर यांना जमीन उपलब्ध होईल असे नाही. वास्तविक अनेक वेळा मागणी करूनही महाराष्ट्र शासनाकडून जमीनधारणेबाबतची १९६१ नंतरची आकडेवारी मिळू शकलेली नाही. त्यामुळे उपरोक्त ठरावात सुचविलेली कमालमर्यादा घालून फेर-

वाटप केल्याने किती छोटया शेतकऱ्यांना व भूमिहीन शेतमजुरांना किमान क्षेत्र उपलब्ध होईल याची आकडेमोड करता आलेली नाही. पण आज असलेली १८ ते १२६ एकरांची कमालमर्यादा ५ ते ३० एकरांपर्यंत खाली आणली तर बरीच जमीन उपलब्ध होऊ शकेल हे उघड आहे. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, सर्व छोटे शेतकरी व आज असलेल्या भूमिहीन शेतमजुरांपैकी निम्म्ये–इतक्यांना किमान क्षेत्र उपलब्ध करून देता येईल. म्हणज आज अनिर्वाहक्षम शेती असलेल्या सुमारे तीस टक्के खातेदारांना व आणखी दहा टक्के भूमिहीनांना किमान क्षेत्र देता येईल.

वरील कमालमर्यादा जिराईत शेतीवर घालण्याबाबत थोडे सबुरीनें चालले तरी एक वेळ चालेल, पण बागाईत क्षेत्राबाबत मुळीच विलंब होता कामा नये अशी संसोपाची भूमिका आहे. त्याची दोन कारणे आहेत. एक तर बागाईतीमुळे एकदम विषमता फार वाढते. दुसरे असे की, काहीजणांची जमीन बागाईत करण्यासाठी अन्य काही जणांची जमीन पाण्यात बुडते. त्यांचे पुनर्वसन नव्याने भिजणाऱ्या क्षेत्रातच होणे आवश्यक आहे. म्हणून बागाईत क्षेत्राचे उपरोक्त कमालमर्यादेनुसार फेरवाटप तात्काळ झाले पाहिजे व नव्याने बागाईत होणाऱ्या क्षेत्राबाबत ही प्रक्रिया त्या त्या वेळी अंमलात येईल अशी व्यवस्था झाली पाहिजे. फेरवाटपाच्या वेळी दलित जातींना अग्रक्रम दिला जावा असा संसोपाचा आग्रह आहे.

प्रजा सोशॅलिस्ट पार्टी व दोन्ही साम्यवादी पक्ष यांचीही भूमिका जवळपास अशीच आहे. प्रा. दांडेकरांनी या पक्षांच्या भूमिका, की ज्या नियोजन मंडळापेक्षा वेगळ्या आहेत, विचारात घेतलेल्या नाहीत. गेल्या वर्ष–दीड वर्षात जमीन फेरवाटपाचा प्रश्न धसाला लावणाऱ्या या पक्षांनी त्यासाठी आंदोलने चालवली आहेत. अशा वेळी त्यांच्या ठरावांचा विचार न करणे योग्य नाही. (राजकीय पक्षांचे ठराव वाचल्याने विद्वानांच्या ज्ञानाला खळ पडणार नाही याची पाहिजे तर हमी देता येईल.)

जमिनीच्या फेरवाटपाचा पुरस्कार काही अर्थशास्त्रज्ञांनीही केला आहे. प्रा. के. एन्. राज हे भारताच्या विविध आर्थिक प्रश्नांवर लिहित असतात. शेती हा तर त्यांचा विशेष विषय आहे. चौथ्या योजनेची आखणी चालू असताना लिहिलेल्या एका लेखात त्यांनी पुढील सूचना केली आहे–

" ...That radical land reform designed to prevent any household from holding land more than 4–5 acres in size (except in very arid regions where adjustments will have to be made taking into account the quality of land) will not only be a major step towards bringing about such a redistribution of income and consumption but promote more extensive adoption of new techno-

logies in agriculture with a labour–intensive bias (as in Japan and Formosa), increase employment opportunities for sections of the rural population which are now exposed to acute under–employment and possibly even increase the rate of investment and saving in the rural sector."

( Alternate approach to the fourth Five Year Plan, p. 52 )

( "...कुठल्याही कुटुंबाजवळ ४–५ एकरांपेक्षा अधिक जमीन राहू नये. [ खडकाळ प्रदेशाचा अपवाद करावा लागेल; जमिनीच्या प्रतवारीनुसार तेथील मर्यादा वेगळी ठेवावी लागेल. ] हे उद्दिष्ट समोर ठेवून केलेली जमीनसुधारणा हे उत्पन्न व उपभोग यांच्यातील विषमता कमी करून फेरवितरण साधण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. एवढेच नव्हे तर जपान व फार्मोसाप्रमाणे श्रमसघन नवे शेतीतंत्र मोठ्या प्रमाणावर अंगिकारले जाण्यात, आज अर्धबेकारीत होरपळणाऱ्यांना रोजगार–संधी वाढवून देण्यात व बहुधा ग्रामीण भागातील बचत आणि गुंतवणुकीचा वेग वाढविण्यातही त्या जमीन फेरवाटपाचे साह्य होईल.)

## वर्धिष्णु शेती घटक आणि विषमता

म्हणजे मुख्यतः विषमता कमी करण्यासाठी ( आणि भविष्यकाळात वाढू न देण्यासाठी ) व काही अंशी निर्वाहक्षम रोजगार वाढविण्यासाठी जमिनीचे क्रांतिकारक फेरवाटप झाले पाहिजे असा प्रा. राजसारख्यांचा दृष्टिकोन आहे. प्रा. दांडेकरांनी प्रा. राज यांचे तरी लिखाण वाचले आहे की नाही याची त्यांच्या प्रबंधावरून कल्पना येत नाही. पा. ४३ व ५७ वरील पहिल्या परिच्छेदांवरून असे स्पष्ट दिसते की जमीन फेरवाटपाने दारिद्र्याचा प्रश्न तर सुटणार नाहीच, उलट देशाचा आर्थिक विकास धोक्यात येईल असे प्रा. दांडेकरांचे मत आहे. दारिद्र्य का निर्माण होते याची सविस्तर चर्चा न केल्याने व रोजगार वाढविणे हाच दारिद्र्य निवारण्याचा एकमेव मार्ग आहे असा आग्रह धरल्याने प्रा. दांडेकर जमीन फेरवाटपाला विरोध करीत आहेत. त्यांच्या प्रतिपादनाचा पायाच सदोष असल्याने निष्कर्ष चुकीचा निघणे स्वाभाविक आहे.


आणखीही एक गंमत आहे. पान २९ वर ते म्हणतात, "जेथे लोकसंख्येच्या मानाने शेतजमिनीचा मुळातच तुटवडा आहे अशा देशात जमिनीचे फेरवाटप करून दारिद्र्य निवारण करणे वरवर कितीहि सोपे व संयुक्तिक भासत असले तरी तें तत्वतःच अशक्य आहे." पुढे ते म्हणतात, "शेतीचे उत्पादन आणि विकास या दृष्टीनेहि हा मार्ग इष्ट वाटत नाही." आणि पान ३० वर ते एकदम म्हणतात, "म्हणून आज मान्य करण्यात आलेल्या कमाल मर्यादा अवश्य प्रामाणिकपणे अंमलात आणाव्यात." का ? जर फेरवाटप शेतीविकासाच्या आड येणारे आहे तर आजची कमालमर्यादा तरी समर्थनीय कशी ठरते ? पुढील उताऱ्यावरून प्रा. दांडेकरांचा

गोंधळ अधिकच स्पष्ट होतो. "फेरवाटप करून भूमिहीनांना एवढ्यातेवढ्या जमिनी दिल्या तरी त्या त्यांच्याजवळ फार काळ राहणार नाहीत. त्या येनकेन प्रकारेण पुनश्च मोठ्या वा मध्यम शेतकऱ्यांकडे वहिवाटीस जातील. आजच्या अर्थ-व्यवस्थेत शेतीविकासाकरता ज्या व्यक्तिगत प्रेरणा आहेत त्यामुळे हे अपरिहार्य आहे. वर सांगितल्याप्रमाणे गेल्या पाच-सात वर्षातील शेतीविषयक शास्त्रीय प्रगती-मुळे मोठ्या प्रमाणात शेती करणे, शेतीत नव्याने भांडवल गुंतवणे निश्चितच फायदेशीर झाले आहे, शेतीविकासाच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची घटना आहे. त्यातून निर्माण झालेल्या प्रेरणांना उत्तेजन द्यावयाचे तर प्रयत्नशील, प्रगतिशील शेतकऱ्यास नव्याने जमिनी खरेदी करून, मान्य कमालमर्यादा न ओलांडता, आपला शेतीधंदा वाढविण्याची संधि असली पाहिजे. आसपासच्या अनिर्वाहक्षम शेत-कऱ्यांच्या जमिनी खरेदीने अथवा कूळवहिवाटीने घेऊन वर्धिष्णू शेतकरी आपला शेतीधंदा वाढवितील हे निश्चित. शेतीधंदा किफायतशीर झाल्याचे हेच एक गमक आहे. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या ही घटना इष्टच मानली पाहिजे. कारण त्या-योगे शेतीत केवळ निर्वाहक्षमच नव्हे तर समृद्ध, वर्धिष्णू घटक निर्माण होतील, की जे शेतीतून भांडवल निर्माण करून पुनश्च शेतीत गुंतवू शकतील. जमिनीची मालकी खाजगी ठेवून शेतीचा विकास साधावयाचा तर हाच मार्ग आहे.

या मार्गाने शेतीविकास होऊ दिल्यास भूमिहीन कुटुंबांची संख्या वाढेल हे खरे. शिवाय याच मार्गाने होणाऱ्या शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे भूमिहीनास शेतीत मिळणारा रोजगारही कमी होईल हे खरे. या लोकांच्या रोजगारीची आणि उदरनिर्वाहाची काहीतरी व्यवस्था करण अर्थातच क्रमप्राप्त होईल, परंतु या साऱ्या लोकांना कसे तरी करून शेतीतच बसविता येईल अशी खुळी कल्पना बाळगण्या-ऐवजी या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल आणि त्यांना शेतीबाहेरच काहीतरी रोजगार द्यावा लागेल हे जाणून ह्या दृष्टीने आवश्यक ती पावले टाकण हेच श्रेयस्कर ठरणार आहे."

प्रा. दांडेकरांना खरे तर अनिर्बंध भांडवलशाही स्वरूपाचा शेतीव्यवसाय उप-युक्त वाटतो आहे. असे असताना 'आज मान्य करण्यात आलेल्या कमाल मर्यादा' ते स्वःत का मान्य करतात हे कळत नाही. आजच्या कमाल मर्यादांचे तरी मग कुठले समर्थन असू शकते ? ते देत बसण्याची प्रा. दांडेकरांना गरज वाटत नाही. प्रा. दांडेकरांचा हा सगळा गोंधळ अगदी अभिजात आहे. तसा दुसरीकडे कुठे सापडणे कठीण. पण नुसता गोंधळ आहे म्हणून दुर्लक्ष करून भागणार नाही. शेती व्यवसायात विषमता वाढू द्यावी असे त्यांचे प्रतिपादन आहे आणि त्यामुळे गरिबी हटविण्याच्या घोषणेला ते मनाने प्रामाणिक असले तरी त्यांच्या प्रतिपादनामुळे गरिबी वाढविण्यालाच ते पाठिंबा देत आहेत असे म्हणावे लागते.

शेतीत रोजगार, काही अंशी का होईना, पण वाढविण्याचा आणखी एक मार्ग



**यांत्रिकीकरणामुळे भूमीहीनांची संख्या वाढेल...**

शिल्लक आहे, जो प्रा. दांडेकरांनाही सहज मान्य होईल. लागवडीखाली आणण्यालायक पडीक जमीन १९५०–५१ साली दोन कोटी सव्वीस लाख त्रेचाळीस हजार हेक्टर जमीन होती. गेल्या वीस वर्षात त्यापैकी काही लागवडीखाली आणली गेली. पण सप्टेंबर १९७० मध्ये झालेला मुख्यमंत्र्यांच्या परिषदेच्या वेळी प्रसारित करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार एक कोटी एक्काहत्तर लाख एक हजार हेक्टर जमीन अद्याप तशीच आहे. एका भूमिहीन कुटुंबाला सरासरीने दोन हेक्टर ( म्हणजे सुमारे पाच एकर ) या हिशोबाने ती वाटण्यात आली तर सुमारे पंचाऐंशी लाख भूमिहीन शेतमजूर कुटुंबांना कायमचा रोजगार उपलब्ध होईल. अर्थात जमीन लागवडीखाली आणण्यासाठी सुरुवातीला त्यांना काही कर्ज व काही अनुदानाच्या रूपाने मदत द्यावी लागेल. कुटुंबामागे सरासरीने रु. ५०० अनुदान व रु. ५०० कर्ज दिले तरी भागू शकेल. शिवाय त्यांनी मशागतीचे काम सहकारी पद्धतीने करावे असे सुचविता येईल. अनेक ठिकाणी असे प्रयोग यशस्वी झाले आहेत.

नव्याने रोजगार वाढविण्यासाठी शेतीत फारसें काही करणे शक्य नाही असे म्हणून प्रा. दांडेकर उद्योगांकडे वळले. वास्तविक स्थायी स्वरुपाचा रोजगार वाढवावयाचा असेल तर उद्योगधंद्यांचा विकास अधिक मोठ्या प्रमाणांत आणि वेगळ्या पद्धतीने झाला पाहिजे. याबाबत समतोल विचार न करता व वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी आणि राजकीय पक्षांनी केलेल्या सूचना विचारात न घेता प्रा.दांडेकरांनी निष्कर्ष काढला आहे की, अति गरीब असलेल्या लोकांना उद्योगधंद्यातहि रोजगार देणे शक्य नाही. मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीची भांडवलाची भूक प्रचंड असल्याने व आपल्याकडे तर भांडवल आणि भांडवल उभारणीचा वेग बेताबेताचाच असल्याने नवा रोजगार फार वाढू शकणार नाही हे खरे. तसेच रोजगार वाढविण्याच्या हेतूने ग्रामोद्योगाचा किंवा खरे तर खादीचा जो कार्यक्रम सुचविला गेला तो बिनकिफायतशीर व म्हणून अव्यवहार्य आहे, हा प्रा. दांडेकरांचा निष्कर्षहि सर्वमान्य होण्यासारखा आहे. पण उद्योगीकरणाबाबत एवढे दोनच पर्याय आहेत अशी जी प्रा. दांडेकरांनी मांडणी केली ती बरोबर नाही वास्तविक आधुनिक लघुउद्योग या पर्यायाचा उल्लेख प्रा. दांडेकरांनी केला आहे. पण रोजगारीची निर्मिती आधुनिक लघुउद्योगहि मोठ्या उद्योगांपेक्षा अधिक प्रमाणांत करू शकत नाहीत म्हणून त्यांचा विचार करण्याची गरज नाही असे ते म्हणतात. प्रत्येक श्रमिकामागे मोठ्या कारखानदारीत सरासरीने रुपये तीस हजारांची ( ३०,००० ) भांडवल गुंतवणूक गेल्या वीस वर्षात झालेली आहे. काही बाबतीत ( उदा. पोलाद यंत्रोद्योग वगैरे सारखे अवजड उद्योग)ही भांडवल गुंतवणूक कमी करणे तंत्र विज्ञानाच्या दृष्टीने अशक्य असेलहि. पण उपभोग्य वतूंच्या बाबत उत्पादनक्षमतेला बाध येऊ न देता दर श्रमिकामागे भांडवल गुंतवणूक कमी करणे अशक्यच आहे असे मानायचे कारण नाही. ती भांडवल गुंतवणूक बरीच कमी करता आली तर आहे या भांडवलाच्या सहाय्याने रोजगार बऱ्याच अधिक प्रमाणात वाढविणे शक्य आहे, हे उघड आहे.

या भूमिकेतून कांही जणांनी मध्यम उत्पादनतंत्राची कल्पना मांडलेली आहे. सोशॅलिस्ट पार्टीने १९५३ साली अल्पप्रमाण यंत्र व त्याच्या सहाय्याने विकेंद्रित स्वरुपाचे औद्योगीकरण या कल्पना मांडल्या होत्या. डॉ राम मनोहर लोहियांनी आकडेवारी देऊन विस्ताराने चर्चा केली व असे मांडले की पाश्चात्य, प्रगत राष्ट्रांचें भांडवल-गुंतवणुकीबाबत अनुकरण न करता आपल्या गरजा व साधनसामग्री यांचा विचार करून नवे तंत्र विकसित केले तर उद्योग धंद्यातील रोजगारीचे प्रमाण १९५१ साली जे ९ टक्के होते ते दोन पंचवार्षिक योजनांच्या काळात १२-१३ टक्क्यापर्यंत वाढविणे शक्य आहे. पण नियोजनमंडळाने ही कल्पना स्वीकारली नाही. समाजवाद्यांनीहि त्या प्रश्नावर विशेष काही केले नाही.


## ग्रामीण उद्योगीकरण

पुढे तिसरी योजना बनविण्याचे काम चालू असताना सर्वश्री जयप्रकाश नारायण, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, ई. एफ्. शुमाकर आणि कै. ध. रा. गाडगीळ यांनी 'ग्रामीण उद्योगीकरण' या धोरणाचा पुरस्कार केला. ग्रामोद्योगांपेक्षा ही कल्पना वेगळी आहे. त्यांचे म्हणणे असे होते की देशाचे उद्योगीकरण मोठमोठ्या शहरांच्या जवळपास मोठ्या उद्योगांच्या सहाय्याने करणे आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्ट्या अनिष्ट आहे. त्याऐवजी ग्रामीण भागात विखुरलेल्या पद्धतीने उद्योगधंदे निघावेत. याचा अर्थ असा नव्हे की प्रत्येक खेड्यात उद्योग काढावेत. साधारणपणे शेतमालाची विक्री करण्यासाठी ज्या बाजारपेठा किंवा मंड्या विकसित झाल्या आहेत, अशा ठिकाणी हे उद्योग निघावेत. जवळपास उपलब्ध असलेली नैसर्गिक साधनसामग्री आणि कच्चा माल यांच्या आधारावर हे उद्योग निघावेत. तसेच उत्पादनतंत्र मध्यम पातळीवरील असावे. म्हणजे दर श्रमिकामागे साधारणपणे रु. पाच ते सहा हजारांची भांडवल गुंतवणूक करावी लागावी.

कै. ध. रा. गाडगीळ यांनी ही भूमिका पुढीलप्रमाणे मांडली होती. 'आर्थिक विकासाच्या नियोजनाचे ग्रामीण उद्योगीकरण हे प्रमुख आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट असले पाहिजे अशी माझी धारणा आहे. एकंदर आर्थिक विकासाची व विशेषतः उद्योगीकरणाची योजना ते उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने आखली गेली पाहिजे. ग्रामीण उद्योगीकरणाबाबतचा आजचा दृष्टिकोन कायम ठेवून सध्याच्या मर्यादित क्षेत्रापुरते काम करीत राहिले तर अल्पकाळात काहीही विशेष साध्य होणार नाही. आणि मोठ्या उद्योगधंद्यांविषयीच्या सध्याच्या धोरणातील प्रवाहामुळे दीर्घकालात भांडवलसधन् व शहरी उद्योगधंद्यांचे प्रभावशाली क्षेत्र निर्माण होईल व ग्रामीण भाग उद्योगरहित, दरिद्री राहील. विखुरलेल्या व छोट्या उद्योगधंद्यांच्या सहाय्याने, भरपूर रोजगार उपलब्ध करून देणारे, कार्यक्षम उत्पादनतंत्राशी व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेशी सुसंवादी असे संबंध देशाचे उद्योगीकरण करणे हा मी ग्रामीण उद्योगीकरणाचा उद्देश मानतो.' [२० जुलै १९६३ रोजी नियोजन मंडळाला सादर केलेले टिपण.]

उत्पादन तंत्राबाबत कै. गाडगीळांनी पुढे एके ठिकाणी म्हटले आहे. 'पुढारलेले उत्पादनतंत्र स्वीकारणे सर्वच बाबतीत शक्य किंवा इष्ट नसते. राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील आर्थिक परिस्थितीची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन विवक्षित क्षेत्रात सुयोग्य उत्पादनतंत्र हुडकून काढण्याची गरज आहे. अशा प्रकारचे उत्पादनतंत्र व्यापकक्षेत्रात व प्रमाणावर आणि बराचकाळपर्यंत स्वीकारण्याची गरज आहे अशा परिस्थितीत मध्यम पातळीवरील उत्पादनतंत्राची उत्क्रांती किंवा विकास व त्यादृष्टीने संशोधन आणि प्रयोग यांचा विचार करणे शक्य होते.'

मध्यम पातळीवरील उत्पादनतंत्र हे ग्रामोद्योगांपेक्षा भिन्न होय. ग्रामोद्योगात व



**प्रत्येक बाबतीत परकीयांची भागीदारी – अनिष्ट प्रथा**

विशेषत: खादीत यांत्रिकशक्ती वापरायची नाही असा कटाक्ष होता. पूर्वी ती परिस्थितीने पडलेली मर्यादा होती पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरसुद्धा ग्रामोद्योगाच्या गांधीवादी पुरस्कर्त्यांनी सांप्रदायिक दृष्टिकोनातून वीज न वापरण्याचा आग्रह चालू ठेवला. हा आग्रह चुकीचा आहे. वीज ही ग्रामीण भागातसुद्धा सहजासहजी, कमी खर्चाने उपलब्ध होणारी शक्ती आहे. तिचा उपयोग आवश्यकतेनुसार केलाच पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, जुन्या परंपरागत तंत्रात क्रमाक्रमाने सुधारणा करीत पुढे जायचे असा ग्रामोद्योगवाल्यानी आग्रह धरला तोही बरोबर नाही. त्या ऐवजी उलट दिशेने सुरुवात करणे शक्य आहे. मोठ्या कारखानदारीत वापरल्या जाणाऱ्या उत्पादन तंत्रात प्रक्रिया वेगवेगळ्या करणे किंवा स्वयंचलीतपणा कमी करणे या दृष्टीने फेरबदल करून कमी भांडवल पुरेल असे उत्पादनतंत्र विकसित करणे शक्य आहे. काही देशात असे प्रयोग यशस्वी झालेले आहेत.

उद्योगीकरणाचा हा दृष्टिकोन स्वीकारला असता तर तेवढ्याच भांडवल गुंत-

वणुकीने जास्त रोजगार देणे शक्य झाले असते. तिसऱ्या व चौथ्या योजनेत अवजड उद्योग आणि उपभोग्य वस्तूंचे उद्योग यांच्यावरील गुंतवणुकीचे प्रमाण निम्मे निम्मे आहे. म्हणजे उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी जेवढे भांडवल गुंतवले गेले ते मध्यम पातळीवरील उत्पादनतंत्राच्या साह्याने गुंतवले असते तर तिसऱ्या योजनेच्या काळात सुमारे ५ लाख अधिक लोकांना रोजगार देता आला असता. पण नियोजन मंडळाने हे धोरण स्वीकारले नाही. याचे कारण असे दिसते की, स्वतंत्रपणे शोध घेत बसण्याऐवजी परदेशात तयार असलेले उत्पादनतंत्र जसेच्या तसे आयात करणे इथल्या भांडवलदारांना आणि त्यांना परवाने देणाऱ्या सरकारला सोयीचे वाटते. बहुतेक बाबतीत परकीयांची भागीदारी झालेली दिसत आहे. (अगदी आईस्क्रिम करण्यापर्यंत) ही प्रवृत्ती अनिष्ट आहे.

प्रा. दांडेकरांनी या पर्यायाचा अजिबात विचारच केला नाही. किंबहुना असा काही पर्याय असू शकतो हेच त्यांना मान्य दिसत नाही. पान ४२ वर ते म्हणतात, 'म्हणून जुने यंत्र आणि तंत्र सोडून नवे अधिक उत्पादनक्षम यंत्र व तंत्र स्वीकारणे ही प्रक्रिया अप्रतिहतपणे चालू राहिली पाहिजे.' पुढे ते म्हणतात, 'तात्पर्य प्रत्येक अर्थव्यवस्थेत जमीन, मनुष्यबळ आणि भांडवल म्हणजेच मानवनिर्मित उत्पादनाची साधने ही काही एका विशिष्ट प्रमाणात उपलब्ध असतात. आणि त्याला अनुरूप अशा एका तंत्र विज्ञानाचा त्या अर्थव्यवस्थेने स्वीकार करावा ही कल्पना वास्तविक नाही. 'वास्तविक' याचा अर्थ 'योग्य' असा घ्यावा अशी प्रा. दांडेकरांची कल्पना दिसते. असो. प्रत्येक अर्थव्यवस्थेने आपल्याला अनुरूप अशा तंत्रविज्ञानाचा स्वीकार करणे योग्य का नाही ? याचे स्पष्टीकरण प्रा. दांडेकर देत नाहीत. त्यांच्या प्रतिपादनामुळे उद्योगीकरणाच्या आजच्या धोरणाला, म्हणजेच ह्यामुळे होणाऱ्या भांडवलाच्या उधळपट्टीला मूकसंमती दिल्यासारखे होते. ही भूमिका 'गरिबी हटाव' या घोषणेशी विसंगत वाटते.

मध्यमप्रमाण उत्पादनतंत्र विकसित होऊन विखुरलेल्या पद्धतीने यापुढील उद्योगीकरण होऊ लागले तरी रोजगार एकदम फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होईल असे नाही. त्यामुळे बेकारी व अर्धबेकारीच्या आजच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रा. दांडेकर सुचवतात त्या पद्धतीची योजना निकडीने हाती घेणे आवश्यक आहे. मात्र याहिबाबत दारिद्र्य हटविण्याचा तो निर्णायक रूपाचा कार्यक्रम आहे अशी भूमिका घेणे योग्य नाही. पहिल्या प्रकरणात त्यांनी १९८०–८१ पर्यंतच्या संभाव्य आर्थिक विकासाची चर्चा केली आहे. नियोजन मंडळाच्या अंदाजाप्रमाणे १९६८–६९ ते ८०–८१ या बारा वर्षात राष्ट्रीय उत्पादन शंभर टक्के वाढेल व सरासरी रहाणीमान बेचाळीस टक्क्यांनी सुधारेल. प्रा. दांडेकरांना

हा अंदाज वास्तववादी वाटत नाही. त्यांच्या मते या बारा वर्षात राष्ट्रीय उत्पादन ५० % वाढेल व सरासरी रहाणीमान ९% नी सुधारेल. तळच्या ४० % लोकांची गरिबी हटविण्यासाठी सरासरी रहाणीमान किती वाढले पाहिजे व त्यासाठी चवथ्या योजनेच्या कार्यक्रमात आणखी किती वाढ केली पाहिजे याची व्यवस्थित चर्चा त्यांनी केलेली दिसत नाही. त्यांच्या गणितानुसार ग्रामीण भागात दरसाल सुमारे रुपये ८२२ कोटींचा जादा रोजगार निर्माण केला पाहिजे. पण तसे केल्याने विकासाचा वेग किती टक्के वाढेल हे त्यांनी सांगितलेले नाही. शिवाय शहरी भागातील गरिबांसाठी त्यांच्या योजनेत तरतूद नाही. ग्रामीण भागातील गरिबी हटविली तर शहरी भागातील गरिबी आपोआप हटेल हे त्यांचे म्हणणे बरोबर वाटत नाही. त्यांच्या योजनेमुळे खेड्यातून शहराकडे जाणारा बेकारांचा लोंढा थांबेल व त्यामुळे शहरातील गरिबी अधिक वाढणार नाही हे खरे पण शहरात आज असलेली गरिबी हीही त्यामुळे कमी होईल असे कसे मानावे ?

आपल्या रोजगार हमी योजनेत रस्ते, पाटबंधारे यासारखी कामे घेतली जावीत असे त्यांचे आग्रहाचे म्हणणे आहे. ते पटण्याजोगे आहे. कमीत कमी भांडवली वस्तू वापरून अधिकात अधिक रोजगार देण्याची क्षमता त्याच स्वरूपाच्या कार्यक्रमात आहे. पण या कार्यक्रमात पहिल्या तीन पंचवार्षिक योजना व दोन एक वर्षीय योजना या काळात जी गुंतवणूक झाली तिचा रोजगारावर कितपत परिणाम झाला याचाही विचार करावयास हवा. १९५०–५१ ते १९६७–६८ या काळात पाट-बंधारे, पूरनियंत्रण, रस्ते आणि रेल्वे यावर एकूण रुपये ५,३९९ कोटी खर्च झाले म्हणजे दरवर्षी सरासरी ३१७ कोटी खर्च झाले. १९६७–६८ साली हा आकडा रुपये ४४८ कोटींचा होता. एवढी रक्कम खर्च होऊन नेमका किती रोजगार उपलब्ध झाला व शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होण्याला काही मदत झाली का हे कोणीतरी आकडेमोड करून सांगायला हवे. प्रथमदर्शनी अशी शंका येते की ज्या कार्यक्रमावर सुमारे रुपये ४५० कोटी एका वर्षी खर्च होऊनही ामीण बेकारी व अर्धबेकारी वाढतच राहिली, तर मग प्रा. दांडेकर सुचवतात तसे आणखी रुपये ८२२ कोटी खर्च केल्याने बेकारी व अर्धबेकारी पूर्णतया नष्ट करता येईल का ? ही शंका निराधार ठरण्याचाही संभव आहे. पण कोणीतरी या दिशेने आकडेमोड व विवेचन करणे आवश्यक आहे एवढेच येथे सुचवायचे आहे.

प्रा. दांडेकरांच्या रोजगार-हमी योजनेच्या अशा काही मर्यादा आहेत, तरीपण रोजगार वाढविण्यासाठी तशा प्रकारचा कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे हे नाकारता येणार नाही. या योजनेसाठी पैसा उभा करण्याचे प्रा. दांडेकर सुचवीत असलेले मार्गही योग्य आहेत. इतर व्यवसायाइतका आयकर शेती उत्पन्नावर बसविणे, प्राप्तिकर व संपत्तीकराचे प्रमाण वाढविणे, चैनीच्या वस्तूंवर भरपूर कर बसवणे, शहरी मालमत्तेवर चढत्या भाजणीने कर आकारणे हे मार्ग आवश्यक




इतर व्यवसायाइतका आयकर
शेती उत्पन्नावर बसवण
आवश्यक आहे.

आहेत. बिगर किफायतशीर शेतीचा सारा मात्र रद्द व्हावा आणि बागायतीवरील कर वाढवावा. याशिवाय कॅपिट्ल लेव्हीसारखे काही मार्ग सुचविता येतील. तसेच दारुबंदी रद्द करणे, संस्थानिकांचे तनखे बंद करणे, राष्ट्रपती व राज्यपाल वगैरेंचे पगार व भत्ते कमी करणे आदि मार्गांनी सरकारी खर्चात काटकसर करून पैसा उभा करणे शक्य आहे.

## संघटनेचा तपशील

प्रा. दांडेकरांच्या योजनेतील संघटनेच्या तपशीलाचा मात्र बारकाईने विचार होण्याची गरज आहे. कुठलाही कार्यक्रम सरकारी यंत्रणेच्या पुढाकाराने अंमलात आणावयाचा तर त्यात काही अडचणी व धोके असणारच. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही. पण अडचण दुसरीच आहे. या योजनेत रस्ते–पाटबंधारे यासारखी कामे घेण्याची कल्पना आहे. ही कामे पूर्ण झाली की, श्रमिकांना तेथून हलवावे लागणार. अशा हलवाहलवीमुळे घरे, शाळा वगैरेंचे प्रश्न निर्माण होतात. हा केवळ सुखसोयी पुरविण्याचा किंवा वाढविण्याचा प्रश्न आहे असे नाही. अशा प्रकारचे अस्थिर किंवा फिरस्तीचे जीवन आज अर्धबेकार असलेल्यांपैकी बहुसंख्य लोक स्वीकारतील का की त्या अडचणींमुळे अशा कार्यक्रमांत जाण्याचेच टाळतील? त्यांनी अशी टाळाटाळ करणे मुळीच समर्थनीय नाही. पण आपल्याकडील स्थिरतेच्या कल्पना व इतर सामाजिक परंपरा यामुळे तसे होण्याचा मोठा धोका

आहे. आजही असे दिसते की, ज्यांना कुठे स्थिर जागा नव्हती अशीच माणसे रस्ते व पाटबंधारे यांच्या कामावर जातात. खेड्यात आपले घर किंवा जागा असलेली माणसे बेकारी किंवा अर्धबेकारी असूनही अशा प्रकारच्या कामांवर जात नाहीत असे दिसते.

ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. पण संसारी लोकांच्या बाबतीत फार आग्रह धरता येणार नाही. त्याऐवजी एक कल्पना सुचवावीशी वाटते. १८ ते ३० वर्षे वयाच्या तरुणांना, लग्न न करता, अशा प्रकारच्या भूसेनेत सामील होण्याची सक्ती करावी. अमेरिकेत जशी लष्करी नोकरी तरुणांना सक्तीची आहे तशी विकसनशील देशात विकास कार्यक्रमातील नोकरी सक्तीची करणे काहीच गैर नाही. शिवाय त्यामुळे विचार, प्रचार व संघटनास्वातंत्र्य यांनाही बाधा येण्याचे कारण नाही. त्यामुळे लोकशाहीच्या दृष्टीने हे अनिष्ट आहे असे मानायचे कारण नाही. अशा प्रकारच्या तरुणांच्या भूसेना उभारल्या तर लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यालाही हातभार लागेल आणि शिस्तीने काम करण्याची सवयही अंगी बाणेल. प्रा. दांडेकरांनी या सूचनेचा जरूर विचार करावा.

## शहाळं खाण्याची ही एक पद्धत

## पण ही त्यापेक्षांही चांगली



भारतातील सर्वोत्कृष्ट नारळांच्या कुरकुरीत स्वादिष्टपणाची मधुर चव तुम्हांला ब्रिटानिया नाईस बिस्किटांत आढळेल. ही उत्तम स्वादाची नि कुरकुरीत असून त्यांवर उत्तम प्रकारची शुभ्र साखर पसरलेली असते. ब्रिटानिया नाईस. वैशिष्टयपूर्ण स्वादाची वैशिष्टयपूर्ण बिस्किटे.

# ब्रिटानिया नाईस बिस्किटे




भारतातील सर्वोत्कृष्ट बिस्किटे




## जीवन

रुक्ष जिवनात
अमृताचा पेला
हलाहलाचा पेला
पचुन जातो ॥ १ ॥

आनंदाच्या शालूला
दुःखाची किनार
शोभिवंत शेला
'तो' पांघरतो ॥ २ ॥

—युवराज वाणी

## तत्वज्ञान

आताच्या वडचा धेडांना।
बंडाला वाव मिळे
नाही राहिला आडोसा
पाप-पुण्याचा ॥ १ ॥

अरे, ही तर पोकळी
अरे, हा तर दगड
दगड ? पोकळी ?
चालला कुठे ॥ २ ॥

नविन तत्वज्ञान
कुठे नेईल कलियुगाला
भविष्य वदे
शेवट नाशात ॥ ३ ॥

—युवराज वाणी

# सुभाष

एकजूट ती पुन्हा दिसू दे
गरम रक्त हे पुन्हा उसळू दे
त्वेष भावना पुन्हा निर्मू दे
फिरुनी दिसू दे मज नेताजी ॥
आज दिसू दे बोस सुभाष
स्पष्ट ऐकू दे त्या शुभ आश
गंभीरतेचा उद्भूदे दंगा
तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा ॥
आज दिसू दे कणखर बोस
संधी मिळू दे ऐकायाची मातृभक्तीचे भाष
सुभाष्याच्या सु-भाष्याचे आज होऊ दे फिरुनी मंथन
मातृभूमीच्या सेवेसाठी पुन्हा होऊ दे मार्ग कथन ॥

पुन्हा सुटू दे देशभक्तीचे सुसाट वारे
पुन्हा चमकू दे भरतभूमीचे तेज न्यारे
हिंदभूमीच्या प्रगतिसाठी पुन्हा दिसू दे युवकजुटी
अशुभ अमंगल आचारांची करुनी एकदा छाटा-छाटी ॥

पुन्हा मारू दे क्रांतीने सखोल सूर
कल्लोळ वलय फैलावू दे दूर दूर अन दूर
भरतभूतुनी तसाच दिसतो
सुवर्णाचा फिरुनी धूर

—धनंजय वैद्य

युवराज रा. वाणी यांच्या 'तत्वज्ञान' या कवितेत खूप काहीतरी सामाजिक वेदना सांगण्याची धडपड दिसते. परंतु इथेही शब्दांचा आवाका अनुभवाचे ओझे पेलण्यास पुरा पडत नाही. पाप-पुण्याचा 'आडोसा राहणे' ही कल्पना एकदम स्वयंभू. अर्थाशी प्रामाणिक राहणारी. खूप आवाहक. पण या कल्पनेत डोकावणारी प्रगल्भ अर्थवाही शक्ती कवितेत बाकी कुठेच आढळत नाही. 'पोकळी' व 'दगड' यांच्या द्वंद्वातून संदिग्धतेशिवाय काहीच निर्माण होत नाही; आणि शेवटी तर 'भविष्य वदे शेवट नाशात' असे ठाम निश्चितार्थ विधान कवितेचा कणाच मोडून टाकते. व्यक्तिगत संवेद्य अनुभूती तिथे सर्वसाधारण प्रस्थापित अधोरेखनात हरवून जाते.

त्याच कवीची 'जीवन' ही छोटीशी कविता मात्र एका छोट्याशा अर्थवर्तुळात फार मोठे आशयाचे परीघ समर्थपणे घेऊन येते. हे जीवन रुक्ष आहे तरीसुद्धा (की म्हणूनच ?) त्यात अमृताचा आणि हलाहलाचा पेला सहजपणे पचून जातो. या रुक्षतेत मुळी सगळे सुखदु:ख आपले अस्तित्वच हरवून बसते. रुक्षतेशी एकजीव होऊन जाते. आनंद आणि दु:ख यांचे सुंदर मिश्रण करून जीवन 'शोभिवंत' करण्याची किमया इथे साधलेली असते. शब्द नेमके वापरले, तर त्यांचा पसारा न घालताही ते अर्थवलयांच्या आकृती कसे रेखाटू शकतात हे या छोट्याशा कवितेवरून यथार्थपणे दिसून येते.

काही मोठी माणसे आपल्या कर्तृत्वाचा फार प्रभावी ठसा उमटवून जातात. भोवतालच्या समाजातली दूरवस्था पाहिली, शैथिल्य पाहिले, म्हणजे अशा कर्तृत्वाची फार तीव्रतेने आठवण होते. धनंजय वैद्य यांना नेताजींची तीव्र आठवण 'सुभाष' या कवितेत अशीच झालेली आहे. 'नेताजी' या शब्दामागे एक उसळते व्यक्तिमत्व त्यांना अभिप्रेत आहे. एक कणखर वृत्ती अभिप्रेत आहे. कवितेच्या शब्दांकनामागील ही भावना प्रत्यक्ष शब्दांकनात मात्र तितक्या समर्थपणे साकारलेली नाही. काही ठिकाणी बाह्यलयीचा तोल साधण्याच्या खटपटीत आशय अगदीच उथळ बनला आहे. त्यामागील आच प्रामाणिक असूनही ती कवितेच्या केंद्रस्थानी प्रखर बनू शकलेली नाही.

— रसिक

# पिळलेली माणसं

मुकुन्द निगवेकर

चरकात पिळलेल्या उसांच्या चिपाडासारखा गलितजाम झालेला भावड्या रंगीपासून उठून उभा राहिला. धोतराचा कासोटा मारत त्याने विजेचे बटण दाबले. अरुंद कुबट खोलीत रंग उडालेल्या भिंतीवर प्रकाशाचा फेस उडाला आणि जमिनीवरील कळकट अंथरुणात अस्ताव्यस्त पडलेल्या रंगीच्या थलथलीत शरीरावर ओघळला. अर्धवट पालथी पडलेल्या रंगीचं, काही क्षणापूर्वी चवीनं कुस्करलेलं उघडं शरीर भावड्याला उजेडात ओंगळ वाटू लागले. तरीसुद्धा त्याने पायाच्या आंगठ्याने तिचा उघड्या मांडीला खाजवले. तशी ती कुशीवर वळत मांजरीसारखी फिस्कारली " जा की मेल्या आता ! माझं भुस्काट पाडलंस तेव्हढं पुरं नाही झालं ! "

डोक्याचा घाम पुसत भावड्या गालात हसला आणि दार उघडून तंगड्या ओढत फूटपाथवरून चालू लागला.

मध्यरात्रीच्या सुमारास मुंबईच्या रस्त्यावरील गर्दी फेसासारखी विरून गेली होती. विजेच्या खांबाखाली पडलेल्या प्रकाशाच्या पुंजक्यातून भावड्या आपल्या दुकानाच्या दिशेने स्वतःला ढकलत होता. अंगाच्या वळकट्या करून त्याच्यासारखेच काही बेवारसी जीव दुकानांच्या फळ्यावर, फुटपाथवर कलंडले होते.

गेली पाच वर्षे भावड्या मुंबईत गाववाल्या शेटच्या खोक्याच्या वखारीत हमाली करीत होता. ऐन पंचवीशीत मस्तीला आलेल्या खोंडासारखा दिसणारा भावड्या मुंबईत आल्यापासून बडवून नांगरटीला जुंपलेल्या बैलासारखा ढेपाळत दिवसेंदिवस ढेपाळत होता. पोट भरण्यासाठी नव्या झिलईची कोवळी तरणी बायको खेड्यात म्हातारीच्या जीवावर सोडून येताना, त्याचा जीव माशासारखा तडफडला होता. पण गावात म्हातारीचे व बायकोचे पोट भरणे अशक्य झाल्यावर त्याला त्याच्या इतर सोबत्यांसारखे मुंबई गाठणे भाग पडले. सुरुवातीचा भेदरट भावड्या आता मुंबईला चांगलाच निर्ढावला होता. हमालीतून रोज ताजा पैसा खमीसाच्या खिशात येऊ लागल्यावर तो अधून मधून छटाकभर ढोसायला शिकला. दुकानाच्या टणक फळीवर झोपून झोपून आंबून ताठरलेल्या शरीराला मनात येईल तेव्हा पैसे टाकून, रंगीच्या मांसल देहावर तो घुसळत होता. लख्ख घासलेल्या कासंडीतील



धारोष्ण फेसाळ दुधासारखे असणारे त्याचे निर्मळ मन आता टमरेलातील गटार-गंगेत चवीने डुंबत होते.

ज्यावेळी रंगीने त्याला प्रथम डोळा घालून खुणावले होते त्यावेळी तो घाबरट सश्यासारखा बिचकला होता. लहान पोरासारखे तिने त्याला हात धरत खोलीत ओढले होते. नव्या सावजाला तिने खुबीने खुलवले होते. रंगीच्या शरीराचे मुग्ध त्याचे तहानलेले तरुण शरीर आकंठून पीत असतानासुद्धा त्याला बायकोच्या नितळ गोऱ्या, घोटीव आकृतीची आठवण होत होती. पण गडी आता सरावला

होता. हॉटेलात पैसे टाकून भेळ खाण्याइतकेच रंगीकडे जाणे त्याला साधे सोपे वाटत होते !

पाय ओढत खोक्याच्या वखारीजवळ आल्यावर त्याने मोकळ्या पिपांत ठेवलेला बिस्तारा काढला व पसरण्यासाठी नेहमीच्या फळीकडे गेला. आपल्या नेहमीच्या जागेवर पायापासून डोक्यापर्यंत पांघरुण घेऊन दुसराच कोणी झोपलेला पाहून त्याचे तापट डोके एकदम भडकले. " कोण रं त्यो ! माज्या जाग्यावर निजलाय ! "

निजलेला गडी ढिम्म् हालला नाही. तसा भावड्या जास्तच उखडला. त्याने खस्‌कन् गड्याच्या तोंडावरचे पांघरुण ओढले, दचकून येंडबाडलेला गडी " ऑय् ऑय् " करीत उठून बसण्याच्या धांदलीत फळीवरून पायरीवर घसरला. जवळ जाऊन वाकून पहात भावड्या ओरडला.

" कोण नान्या ! भडव्या आज माज्या जागेवर कारं निजलास ? तिकडे उलथ जा की तुज्या फूटपायरीवर. "

गाढ झोपेतून उठवल्यामुळे नान्या पिसाळल्यासारखा झाला. जांभया देत उद्‌गारला. " मग काय झालं ? तुज्या बाची जागा हाय का, एवढा तापलायस त्यो ! "

नान्या, गुमान उठ आनी जा ! उगीच टाळकं तापवू नगस. "

तसा नानु त्याचा गाववालाच. पण बेनवड लई कुजका होता.

" नान्या ! आता गप् उठतोस की घालू लाथ कमरेत ?"

लुकडा नानू बडबडत उठला. गोणपाट गोळा करून धडपडत निघाला.

" गाडवानो, झेपत नाही तर पिताय कशाला जास्तीची. " भावड्या.

" लई शेफारू नगस, भावड्या ! "

" मग माकडीच्या, माज्या जागेवर आज तू का निजलास ?"

नानू जरा बिथरल्यागतच झाला होता. चटकदिशी वळून तो म्हणाला, "माहीत आहे, मोठ्या आबरूचा लागलास तू. गावाकडं तुज्या जागेवर, बायकोच्या हाथरुणात कोण निजतय ते ठाव हाय मला ! "

बायकोचं नाव काढल्यावर भावड्याचा तोल सुटला. त्याने पुढे होऊन नानूच्या फडाफड चार थोबाडीत हाणल्या. डोळ्यापुढे काजवे चमकल्यावर नानूची निशा उतरली व तो मुकाट निघून गेला.

नानू गेला पण फळकुटावर भावड्या पेटतच राहिला. साला, काय म्हणाला ते खरं की काय ? पण आपली बायडी तशातली नाही. आपण वरीसभर घराकडं गेलो नाही. पैशाच्या नादानं इथंच राहिलो. काय खरं नाही. भडवा नान्या कुजक्या मेंदूचं आहे. आफ्ली यशोदी तशी नाही. लग्न झालं तेव्हा नुसता हात लावला तरी बुजायची. सुरंकन खारीसारखी आत पळायची. आपण जायला पायजे होतं. सालं चुकलंच.

आणि कधी नाही ते त्याला रंगीकडे गेल्याची आज भलतीच शरम वाटली. आपलं शरीर त्याला लूद भरलेल्या कुत्र्यासारखं वाटू लागलं. शेण खाल्ल्यासारखे तोंड झाले. त्यात नान्याचे शब्द मुंगी डसल्यासारखे मनाला झोंबत होते. रात्रभर तो उसासत राहिला.

सकाळी उठल्याबरोबर त्याने शेटकडे रजेसाठी तोंड पसरले. दुकानात ठेवलेली ट्रंक काढली. लहानग्या बाबूसाठी घेतलेला तयार चड्डीसदरा त्याने त्यात भरला. यशोदेसाठी घेऊन ठेवलेलं छापील नवीन लुगडं त्याने हळुवारपणे घडी घालून ठेवले. त्याने धावतच एस्. टी. गाठली. गावाकडे जायला तो आता फार उतावळा झाला होता. ओढाळ बैलासारखं त्याचं मन त्याला हिसकं मारत होतं. दोन वर्षा-पूर्वी म्हातारी खपली होती. तेव्हापासून यशोदी गावाकडे लहानग्या बाबूस घेऊन एकटी मोलमजुरी करत होती. कोणा येत्या-जात्याबरोबर तो तिला पैसे पाठवत होता. मास्तराकडून लिहून घेतलेलं तिचं एखादं कार्ड महिना दोन महिन्यातून येत होतं. कधी येत्या-जात्याकडून सांगावा येत होता. आता जाऊ, पुढच्या महिन्यात जाऊ असे करीत या खेपेला भावडयाने गावाकडं जायला फारच वेळ लावला होता. बायकोच्या काळजीने तो व्याकुळ झाला. खरं म्हणजे रंगीने त्याला पैशाकडून फार नाडले होते. रंगीच्या उघडया शरीराची आठवण झाल्याबरोबर त्याला स्वतःच्याच थोबाडीत फाडफाड मारून घ्यावेसे वाटू लागले. ओशट खाऊन पारोशाने देवळात निघाल्यासारखे त्याला वाटत होते. साबणाची अर्धी वडी घासून ओढयाच्या पाण्यात अंग घासून काढावे व मगच घरी पाऊल टाकावे असे त्याला वाटू लागले.

एस. टी. गावाच्या फाटयावर आली तेव्हा रात्रीची जेवणवेळ टळून चांगल्या दोन घटका झाल्या होत्या. चार-पाच डोकी बोचकी घेऊन उतरली. फर्लांगभर असलेल्या गावाकडे जाण्यासाठी भावडया इतर माणसांची वाट न पहाता ट्रंक खांद्यावर घेऊन अंधारातून झपाझप चालू लागला. मारुतीसमोरच्या पाराला वळसा घालून तो गुडुप अंधारात निजलेल्या सुतार आळीत शिरला. दोन-तीन कुत्री केकाटत उठली. आळीच्या एका टोकाला असलेल्या आपल्या छपराजवळ आल्याबरोबर मोठयाने यशोदेला हाक मारावी असे त्याला वाटले. पण लहान बाबूची झोपमोड होईल म्हणून त्याने मन आवरले. कुंपण ओलांडून तो दाराजवळ आला. दारातून पिवळ्या प्रकाशाची रेघ बाहेर येत होती. दार नुसतेच पुढे लोटले होते! उंबऱ्यात नुकत्याच विझवलेल्या विडीचा दर्प नाकात भरत होता! कुजक्या नानूच्या शब्दांची पापी पाल मनात चुकचुकली. पोटात एकदम खड्डा पडला!

त्याने ट्रंक आवाज न करता अलगद दारात ठेवली. बेताने दार उघडले. कळकट कंदीलाचा पिवळट प्रकाश खोलीत पसरला होता.

कोपऱ्यात मुटकुळे करून लहानगा बाबू झोपला होता.

खोलीच्या एका टोकाला भिंतीलगत अंथरुणावर त्याची बायको पालथी निजली

होती ! विस्कटलेल्या सैल लुगड्याचा घोळ अर्धवट तिच्या कमरेजवळच्या उभारी-वर होता. पिवळा प्रकाश तिच्या उघड्या मांड्यावर, पाठीवर पडला होता.

भावड्याच्या डोळ्यासमोर कालच्या रात्रीची पालथी निजलेली उघडी रंगी आली. तिचे शब्द डोक्यात वळवळले, "मेल्या, माझं भुस्काट पाडलंस !"

पेट्रोलचा डबा पेटल्यासारखा भावड्या भडकला. भितीला टेकून ठेवलेला अवजड पाटा त्याने झटकन् उचलला आणि दाणकन् तिच्या डोक्यात जोराने घातला !

आणि दुसऱ्याच क्षणाला दोन्ही हाताने ठो ठो बोंबलत भावड्या लूद भरून पिसाळलेल्या कुत्र्यासारखा सुतार आळीच्या अंधारातून धावत सुटला.

□ □ □

---

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

प्रसिद्धी : १५ ऑगस्ट १९७१

---

सौ. पुष्पा भावे

# पुस्तके

## परशुरामाची सावली

### मराठी कादंबरी जुन्या साच्यातून मुक्त होत आहे

श्री. रवींद्र पिंगे हे नाव गेली काही वर्षे वेगवेगळ्या संदर्भात आपल्याला परिचित आहे. एकांकिका, कथा, प्रवासवर्णन असे विविध लेखन प्रकार त्यांनी हाताळले आहेत; विविध लेखनस्पर्धांमध्ये पारितोषिकेही मिळवली आहेत. परंतु एका विशिष्ट वाङ्मयप्रकाराचे सातत्याने लेखन न केल्याने असेल—पण त्यांच्या नावाला विशिष्ट वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा संदर्भ प्राप्त झालेला नाही. 'परशुरामाची सावली' ही त्यांची कादंबरी 'दीपावली' मासिकाच्या लघुकादंबरीलेखनस्पर्धेच्या निमित्ताने लिहिली गेली. या स्पर्धेतील दुसरे पारितोषिक या कादंबरीला मिळाले. या कादंबरीच्या शीर्षकातून सूचित झाल्याप्रमाणे कोकणची भूमी हा या कादंबरीचा रंगमंच आहे; परंतु त्यातील मूळ अनुभव प्रादेशिकतेवर अवलंबून असणारा नाही.

चिबावे नावाच्या खेड्यात या कादंबरीचा प्रारंभ होतो. शहरच्या ओढीने सारी माणसे कोकणच्या भूमीचा त्याग करतात याची खंत बाळगणारा, परशुरामाच्या या भूमीचे पुन्हा नांदते गोकुळ करण्याची आकांक्षा बाळगणारा एक छोटा मनुष्य—काका बर्वे या गावात आहे. बर्वे काकांची धडपड हा या कादंबरीचा केंद्रबिंदु आहे. हिटलर हे ज्यावेळी चलनी नाणे होते तेव्हापासून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गांधी-वधाच्या जाळपोळीपर्यंतचा कालखंड या कादंबरीला लाभला आहे. काळ बदलतो, वस्तूंचे भाव बदलतात, रोजच्या संभाषणाचे विषय बदलतात; पण मानवी समाजात एकच गोष्ट कायम राहाते : धर्म, देश, जात, वर्ग इ. च्या नावाने माजलेली क्षुद्र युद्धे. कादंबरीच्या पहिल्या प्रकरणात स्वत: काकादेखील अशाच एका युद्धाला हातभार लावतात आणि शेवटी अशाच दुसऱ्या युद्धाचे लक्ष्य बनून कोकणातून परागंदा होतात.

या कादंबरीच्या रचनेचे स्पष्ट तीन टप्पे आपल्याला दिसतात. विधवा ताईची वेणू गाय नाहीशी होते; ती मुसलमानांनी कापली अशी अफवा उठते; आणि त्या

छोटया गावात हिंदु-मुसलमान वैराची ठिणगी पडते. पण अचानक वेणू गाय परत येते. हे पहिले प्रकरण एका स्वतंत्र दीर्घकथेसारखेच स्वयंपूर्ण आहे. वेणू गाय परत आल्यामुळे हिंदु-मुसलमान वैराला अधिकच जोर येतो आणि रातोरात सर्व हिंदूंना चिबावे सोडून दुसऱ्या ठिकाणी वस्तीला जावे लागते. कादंबरीच्या दुसऱ्या टप्प्यावर देश स्वतंत्र झाला आहे; चिबावेकर मंडळी उजाड माळावर स्थिरस्थावर झाली आहेत; काकांना पुढारीपण मिळालंय; पण हिंदु-मुसलमान दंगलींनी, बंगालमधील निर्वासितांच्या हकीगतींनी त्यांचे तोंड कडू झाले आहे. या हिंदु निर्वासितांना चिबावेकरांनी मदत करावी, पहिल्या आंब्याचे उत्पन्न द्यावे, चिबाव्यातील घरे द्यावीत असा प्रस्ताव ते मांडतात. या प्रस्तावापासून काकांच्या लोकप्रियतेच्या ओहोटीला व कादंबरीच्या तिसऱ्या टप्प्याला प्रारंभ होतो. या प्रस्तावाच्या चर्चेत, काका जमीन कसत नाहीत, स्वतः कमावत नाहीत आणि फुकटचं श्रेय घेतात असा मुद्दा निघतो; त्यांच्या ब्राह्मणी काव्याचाही उल्लेख होतो. बदललेले हे वातावरण कादंबरीकाराने एकाच वाक्यात सूचित केले आहे –' काकांच्या घरच्या रस्त्यावर प्रखर ऊन पडलं होतं. " (पृ ११०) बंगालमधील निर्वासितांना मदत पाठवण्याच्या कामासाठी काका राजापूरला जातात ,तो गांधीवधाची बातमी येऊन थडकते; आणि पाठोपाठ ब्राह्मण ब्राह्मणेतर तेढ सुरू होते. काकांच्या घरावर ' आज रात्री बामणाच्या घराची होळी ' असे पत्रक लागते. मुंबईविषयी तिटकारा बाळगणारे काका निमूटपणे रात्रौ मुंबईलाच परागंदा होतात.

ही नाटयपूर्ण कथा लेखकाने संथ संयत रचनेतून मांडली आहे. येथे कोणी व्यक्ती वाजवीपेक्षा उंच वा उग्र नाही. बरेवाईट सगळेच खुजे आहेत. काकांच्या कल्पना मोठ्या असल्या तरी व्यक्तिमत्त्वात ताकद नाही; शिवाय आजारी पत्नी-मुळे अपंगत्व आलेले आहे. श्री. पिंग्यांची भाषाशैली सहज आहे, प्रादेशिकतेचे प्रलो-भन असूनही वर्णनासाठी वर्णने त्यांनी लिहिलेली नाहीत, वा विशिष्ट समाजाचे तपशीलवार वर्णनही केलेले नाही. कथनाच्या ओघात, महंमद मास्तरना, मास्तरीण होऊ पहाणारी हिंदु मुलगी भेटल्यावर कोंबडयांमध्ये रमणारी आपली मुलगी दिसते, अशा तपशीलातून समाजा-समाजातील अंतर ते स्पष्ट करतात. या कादंबरी-तील कथनाच्या तुलनेने ' परशुरामाची सावली ' हे शीर्षक मात्र फार आकांक्षी वाटते.

श्री. रवींद्र पिंग्यांची ही पहिली कादंबरी लेखनाच्या नवखेपणाच्या अनेक खुणां-पासून अलिप्त आहे. लघुकादंबरीचे गेल्या वर्षातले विविध आविष्कार पाहिले की वरवरच्या नव्या प्रयोगांव्यतिरिक्तही मराठी कादंबरी जुन्या साच्यातून अधिकाधिक मुक्त होताना दिसते आहे. ◻

**परशुरामाची सावली** : रवींद्र पिंगे : विश्वकर्मा साहित्यालय : मूल्य ३–५०

विदेश वार्ता । सु. ल. सोमण

# कालाय तस्मै नमः

वीस पंचवीस वर्षापूर्वी अमेरिकन अध्यक्ष रुझवेल्ट ह्यांना एका स्त्री विदुषीनं सांगितलं की, नंतरच्या आठ दहा वर्षांच्या काळांत चीन ही अमेरिकेची सर्वात मोठी डोकेदुखी ठरेल. दीर्घकाळच्या लढ्यांत अमेरिका चीनबरोबर गुरफटली जाईल. त्यावेळशी परिस्थिती अशी होती की, चीनबरोबरच्या वैमनस्याचं स्वप्न देखील कुठलाहि अमेरिकन पाहू धजावला नसता. साहजिकच प्रे. रुझवेल्टसह सारेच, त्या विदुषीच्या भविष्यकथनावर खदखदून हसले ! पण बदलत्या काळाबरोबर ते हास्य विरत गेलं. कुणी कबूल करो, न करो, पण चीनचं सामर्थ्य वाढत गेलं. कोरिया, विएतनाम, कंबोडिया, किंबहुना संपूर्ण आशियात, चिनी वर्चस्वाशीच अमेरिकेला लढा द्यावा लागला. चीन-अमेरिका जणु एकमेकांच्या सर्वनाशासाठी उभे राहिल्याचं दृश्य दिसू लागलं.

.. पण काळ धावत होता. चक्रं उलटसुलट फिरवण्याचं सामर्थ्य त्याच्या हाती आहे. चीन निर्विवादरित्या तिसरी शक्ती म्हणून जगात वावरू लागण्याच्या बेतालाच, चिनी-रशियन मधुचंद्र संपुष्टात आला. त्या दोघांचे संबंध इतके बिघडले की, आपसातला सशस्त्र संघर्षही त्याना थोड्या प्रमाणात अनुभवावा लागला. त्यांचं वैमनस्य आज वाढत आहे. कम्युनिस्ट जगाच्या नेतृत्वासाठी त्यांच्यांत स्पर्धा चालू आहे. अशा वेळी ह्या तिसऱ्या शक्तीला, रशियाविरुद्ध आपल्याकडे वळवून घेता आलं तर समतोल आपल्या बाजूनं ढळलेला आढळेल असा होरा अमेरिकेनं बांधला असल्यास नवल नाही. ह्या खेरीज अंगाशी आलेल्या विएतनाम युद्धातनं बाहेर पडायचाही मार्ग अमेरिकेला चिनी मदतीमुळे सापडण्याची शक्यता होती. आणि ७६ कोटींच्या बाजारपेठेत, सर्व युरोपीय राष्ट्रे घुसत असताना अमेरिकेनं बघ्याची भूमिका घेऊन गप्प बसावं हेही अमेरिकेला मानवण्यासारखं नव्हतं ! !

चीनपुढेही अनेक प्रश्न उभे आहेत. व्यापार वाढवणं हे जसं चिनी अर्थव्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीनं आवश्यक होतं, तसंच रशियाविरुद्धच्या आघाडीत अमेरिकेची साथ असणंही चीनला आवश्यक होतं. त्याचसाठी चीननं 'पिंगपाँग' नीतीचा अवलंब केला. त्यांच्या पवित्र्याला फळही खूपच लौकर आलं !

पेंटॅगॉन पेपर्सनी बऱ्याच जुन्या अमेरिकन निर्णयांना प्रकाशात आणलं आहे !

विएतनाम प्रकरणाच्या सुरुवातीला, फ्रेंच साम्राज्यवाद्यांविरुद्ध, विएतनामच्या राष्ट्रवादी हो चि मिन्ह ह्यांनी अमेरिकेकडे मदतीसाठी याचना केली होती !

—चँग कै शेकच्या दडपशाहीविरुद्ध हत्यार उपसताना माओ त्से तुंगच्या राष्ट्रवादी गटांनी, रशियाच्याही आधी, अमेरिकेकडे मदतीसाठी धाव घेतली होती ! !

पण अशा प्रत्येक वेळी "स्वातंत्र्यप्रेमी" (??) अमेरिकेने त्या त्या देशातल्या राष्ट्रवादी शक्तींना साथ दिली नाही! त्यांच्याविरुद्धच वेळोवेळी संघर्षात उडी घेऊन संघर्ष भडकवले, त्या राष्ट्रवादी मंडळींना कम्युनिस्ट रशियाकडे पिटाळलं!!

आज रशियाविरुद्धची स्ट्रॅटेजी म्हणून; आपल्याच चुकांमुळे खोल रुतलेला पाय सहीसलामत बाहेर यावा म्हणून, अध्यक्ष निक्सन पेकिंग-हॅनोईची वारी करायला जात आहेत! त्यांचे खास सल्लागार डॉ. किसींजर त्यासाठी गुप्त उड्डाण करीत आहेत. एखाद-दोन वर्षांपूर्वी कुणी असं भाकीत केलं असतं, तर त्यालाहि, २५ वर्षापूर्वीच्या त्या विदुषीप्रमाणेच वेड्यात काढलं गेलं असतं. पण काळ चाकं कधी कधी पार उलटी फिरवतो, ती ही अशी.

राजकीय नीती, धोरणं आदि बाबतीत परस्परात दोन ध्रुवांहूनही अधिकच अंतर असलेली ही राष्ट्रं आज जवळ येण्यासाठी धडपडताना दिसत आहेत. त्या त्यांच्या प्रयत्नांचं जगभर कोडकौतुकही होत आहे. वैचारिक मतभेदांची तमा न बाळगता, केवळ राष्ट्रीय स्वार्थ डोळ्यांसमोर ठेवून ही राष्ट्रं जवळ येऊ पाहात आहेत. कम्युनिझम, समाजवाद, लोकशाही, भांडवलशाही आदि पोकळ वल्गनांच्या जडजांबाळात ही दोन्ही राष्ट्रं आज अडकलेली नाहीत. त्यांनी पाहिला तो केवळ राष्ट्रीय स्वार्थ!!

ह्या दोन राष्ट्रांच्या एकत्र येण्यानं परिस्थितीवर फार मोठा परिणाम नजीकच्या काळात होणार ह्यात शंका नाही. तथापि ह्या युतीतून चीनच्या पदरात बरंच काही पडेल असा होरा वर्तवायला मात्र काही हरकत नाही. ह्या युतीतून विएतनाम, कोरिया, तैवान इत्यादि ठिकाणाहून काढता पाय घेणं बहुश: अमेरिकेला भाग पडेल. अर्थात, आशियात चीनला मोकळं रान सापडेल. अमेरिकन पाठिंब्यावर रशियन वर्चस्वालाही पायबंद घालणं कदाचित् चीनला शक्य होईल. तर उलट अमेरिकेला, चिनी मध्यस्थीमुळे इंडो-चायनामधून यशस्वी माघार घेता येईल. रशियाबरोबरच्या स्पर्धेत चिनी हुकमी एक्का हाताशी असल्यामुळे वर्चस्व संपादता येईल; त्याचबरोबर युरोपमध्ये आपलं वर्चस्व शाबूत ठेवता येईल! चीनबरोबरच्या सलोख्यामुळे, विएतनाम युद्ध संपवण्याचं श्रेय मिळाल्यामुळे निक्सन आणि मंडळींना १९७२ च्या सार्वत्रिक निवडणुकांत भरघोस यशाची संधी मिळेल ते शिवाय वेगळेच!

ह्या वेळी भारताचं काय? रशियाची पावलं कशी पडतील? बाँगला देशचं काय? असे अनेक प्रश्न अनुत्तरित रहातात. अनिवार्यपणे, रशिया-भारत मैत्री वृद्धिंगत होईल असं अनेकांना वाटतं. तर, बाँगला देश प्रश्न बाजूला पडून, वॉशिंग्टन-पेकिंग प्रश्नावर जगाचं लक्ष्य केंद्रित होईल. आणि रावळपिंडीला निक्सन आणि माओ दोघंही साथ देतील. (कारण तो त्यांच्यातला दुवा ना!) असाही एक मतप्रवाह आहे. पण मला ही शक्यता वाटत नाही. कारण, पाकिस्तानच्या रूपानं अमेरिकेची आशियातली उपस्थिती चीन मानणार नाही. साहजिकच, कालावधीनंतर (कदाचित् पहिल्या बोलण्याच्या फेरीनंतर लगेच!) चीन, 'बाँगला देश'च्या

स्वातंत्र्य चळवळीला उचलून धरील. विएतनाममधल्या यशानं ही शक्यता वाढली आहे आणि पुन्हा चीनविरुद्ध अमेरिका हाच संघर्ष अप्रत्यक्षत: पूर्व बंगालमध्ये उपस्थित होईल. (पेकिंगनं अद्यापही, शेख मुजीब वा अवामी लीग ह्यांच्याविरुद्ध अवाक्षरही उच्चारलेलं नाही हे इथे लक्षात घेतलं पाहिजे !) शिवाय, आशियातल्या खऱ्याखुऱ्या प्रतिस्पर्धी राष्ट्रांच्या सीमांवर पाकिस्तान व बांगला देश ही दोन दुर्बल राष्ट्रं हे केव्हाही चीनच्याच पथ्यावर पडणारं आहे !!

भारताची पुढची पावलं ह्याच दृष्टीनं पडली पाहिजेत.

वॉशिंग्टन-पेकिंग युतीच्या बातम्या पसरू लागल्यापासून सर्वांत अलिप्तपणा जर कुठलं राष्ट्र दाखवीत असेल, तर तें रशिया ! वॉशिंग्टनमध्ये परराष्ट्र मंत्री रॉजर्स ह्यांच्याकडे देशोदेशींच्या वकिलांनी रीघ लावली आहे. त्यांच्या टेलिफोन्सना क्षणाचीही उसंत नाही. बहुतेक सर्व देशांच्या वकिलांनी रॉजर्स ह्यांच्या मुलाखती मागवून निक्सन-घोषणेविषयीचा तपशील मिळवायचा प्रयत्न केला आहे. परंतु ह्यांच्यातही एक अपवाद मात्र आहे नि तो म्हणजे मि. डॉब्रिनीन, रशियन दूत !

अध्यक्षीय भाषणाच्या आधी काही काळ, विल्यम रॉजर्स ह्यांनी डॉब्रिनीन ह्यांना फोनवरून अध्यक्षीय घोषणेची सविस्तर कल्पना दिली. उत्तरादाखल डॉब्रिनीन उद्गारले, 'अस्सं !!'

— मॉस्को, रशियन वृत्तसंस्था त्यांच्या वकिलाइतक्याच ह्या प्रकरणी थंड आहेत ! कदाचित् स्पुटनिक सोडण्यापूर्वीची ती शांतता असावी !!

## मोरोक्को—उठाव दडपला; पण....

मोरोक्कोचे राजे हसन (दुसरे) ह्यांच्या ४२ व्या वाढदिवसाची पार्टी चालली होती. पश्चिम आफ्रिकेतल्या ह्या छोटेखानी राजशाहीत ह्याच सुमारास दुसरीही धावपळ चालू होती. इस्लामी जगतात ध्रुवीकरण करण्यासाठी ह्या राजशाहीची धडपड चालू आहे. त्याच अनुषंगानं, काही दिवसांपूर्वी, ह्या राष्ट्राची राजधानी राबात, भारतात सर्वतोमुखी झाली होती. ह्याच राबातमध्ये, स्किरेत् राजवाड्यात हात वाढदिवसाचा सोहळा चालू होता. त्याचवेळी राजवाड्यात चारी बाजूनी सैनिक शिरले. गोळीबाराची धुमश्चक्री झाली. राजे हसन बळी पडल्याच्या बातम्या उठल्या. राबात नभोवाणीवरून नव्या प्रजासत्ताकाची घोषणा झाली. सत्ता सैन्याच्या हातात आल्याच्या बातम्या प्रसृत झाल्या...पण ह्या साऱ्या बातम्याच ठरल्या ! कारण राबात नभोवाणीवरल्या प्रजासत्ताकाच्या घोषणेनंतर अवघ्या छत्तीस तासात, खुद्द राजे हसन ह्यांनी राष्ट्राला उद्देशून, राबात केंद्रावरूनच भाषण केलं. फ्रेंच वृत्तसंस्थेला मुलाखत दिली. बंडाचा बीमोड झाल्याचं ठासून सांगितलं. कटाच्या

नेत्यांची नाव जाहीर केली. त्यातले कित्येक गारद झाले असल्याचं जाहीर झाल.

आफ्रिकी राष्ट्रांमधले उठाव नवीन नाहीत. ब्रिटिश-फ्रेंच-डच राजवटी नाहीशा झाल्यानंतर, आफ्रिकेतल्या राष्ट्रांतून सतत कुठे न कुठे उठाव होत राहिले. राजवटी बदलत गेल्या. ह्या उठावात, बहुधा जनतेनं नव्हे, तर सत्तालालसी सैन्याधिकाऱ्यांनीच पुढाकार घेतला. त्यामुळे ह्या राष्ट्रातून स्थिरता अशी निर्माण झालीच नाही आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. आर्थिक-सामाजिक दृष्टचा आफ्रिका मागासलेलाच राहिला. राजकीय दृष्टचाही तो प्रगल्भ बनू शकला नाही ! आफ्रिकी राष्ट्रांच्या ह्या ताज्या इतिहासाला, आफ्रिकी राष्ट्राची एकता परिषदही धड वळण लावू शकली नाही ! मोरोक्कोही ह्याला अपवाद नाही. तिथला ताजा उठाव तूर्त दडपला गेला असला तरी, त्या राष्ट्राच्या पुढच्या वाटचालीच्या दिशेनं कुठलंही पाऊल पडलेलं नाही. त्याचप्रमाणे, तिथला ताजा उठाव केवळ लष्करी





दोन जमातीत कायमचा सलोखा
नांदावा म्हणून प्रेम व जीवित यांचे
बलिदान करणाऱ्या
दोन जीवांची कथा...

निर्माते-दिग्दर्शक ✤ संगीत
**सुनील दत्त** **जयदेव**

लेखक
**अली राजा**

भू. **सुनील दत्त, वहिदा रेहमान, राखी, जयंत, सुलोचना, के. एन्. सिंग, नवलकुमार, रणजीत. सोबत : अभिताब बच्चन व विनोद खन्ना.**

| **अप्सरा** | **प्लाझा** | **कॅपिटॉल** | **रूपम** |
|---|---|---|---|
| ३।, ६।, ९। | १२।, ३।, ६।, ९। | ३।, ६।, ९।, शुक्र. शनि. रवि. १२। वा. | ३।, ६।, ९।, |

**बांद्रा टॉकीज**, **डिफेन्स** (कुलाबा), **ऑस्कर** (अंधेरी), **हंजर** (जोगेश्वरी), **अनुपम** (गोरेगाव), **न्यू इरा** (मालाड), **अजंठा** (बोरिवली), **उदय** (घाटकोपर), **आकाश** (कुर्ला), **अशोक** (ठाणे), **जवाहर** (मुलुंड), **कृष्ण** (भांडुप) **प्रकाश** (कल्याण), **सपना** (उल्हासनगर) — छाबडा प्रकाशन —

महत्त्वाकांक्षेतनंच झाला होता, असा प्रचार राबातचं शासन करीत असलं तरी, त्यात तथ्य किती ह्याविषयी बऱ्याच पाश्चात्य वृत्तपत्रांनी, राजकारण्यांनी शंका व्यक्तविली आहे...

राजे हसन ह्यांचं अधिपत्य मोरोक्कोवर गेली दहा वर्षे आहे. काही अंशी मोरोक्कनांचं राहाणीमान, शिक्षण वगैरे बाबतीत भरीव कामगिरीही हसन राजवटीनं केली आहे. १९६१ मध्ये हसन ह्यांनी राजेपद पटकावलं. त्यावेळच्यापेक्षा आज, मोरोक्कोचं दरडोई उत्पन्न वाढलं आहे. आर्थिक मांडही बरी बसली आहे. सैन्यांतही फारसे मतभेद नाहीत. विषमता आहे; परंतु सैन्याची स्वामीनिष्ठा, बरं अर्थकारण ह्यामुळे त्यांच्या पदाला गेल्या दहा वर्षांत धोका असा कधी फारसा झाला नाही. तथापि, राजकीय व वैचारिक स्वातंत्र्यापासून मात्र त्यांनी आपल्या प्रजेला वंचित ठेवलं. भडकत्या विषमतेमुळे, महागाईमुळे, सामान्य जनता त्रस्त होते. यातूनच काही विद्यार्थ्यांचे उठाव झाले. क्वचित् कटही उघडकीला आले. कामगारांचे लढे झाले. त्या साऱ्यांतून राजे हसन ह्यांना धोका मात्र कधीही निर्माण झाला नाही. निर्णायक तर नाहीच नाही. पण जनमत मात्र कलुषित होत राहिलं ! १९६२ मध्यें, म्हणजे सत्ता गहणानंतर वर्षांनी, राजांनी मोरोक्कोत राष्ट्रीय विधिमंडळासाठी निवडणुका घेतल्या. लोकशाहीची घोषणा केली. पण प्रत्यक्ष विधिमंडळ मात्र कधीच अस्तित्वात आलं नाही ! त्यानंतर, नऊ वर्षांनी, गेल्या वर्षी, मोरोक्कोला नवीन घटना मिळाली. तीनुसार, राजे हसन ह्यांना मोरोक्कोतून जनतेचं सर्वोच्च प्रतिनिधित्व बहाल केलं गेलं ! गेल्या जुलैमध्ये त्यांनी निवडणुकांचं नाटकही घडवून आणलं. ईस्तिक्लाल व बेन बार्कांची नॅशनल युनियन ह्या दोन प्रमुख डाव्या पक्षांनी व इतरही छोटया पक्षानी ह्या तथाकथित निवडणुकांवर बहिष्कार घातला होता. साहजिकच, दोन तृतीयांश जागा बिनविरोध हसन ह्यांच्या माणसांना मिळाल्या. एकूण ३३० प्रतिनिधींच्या सभागृहात त्यांनी ३०० जागा मिळविल्या.

गेली दहा वर्षे राजे हसन, बऱ्याच समर्थपणे हा राजशकट चालवीत असले, तरी राजकीय-सामाजिक अशांततेची काळी किनार त्याला आहेच. त्यामुळेच राबात विद्यापीठात वेळी-अवेळी लष्कर बोलवावं लागतं ! दरवर्षी, शेकडयांनी 'कट' करणाऱ्यांविरुद्ध खटले भरले जातात !! ह्या साऱ्या दडपल्या आवाजांचा उठाव, डाव्यांना मिळणारी सहानुभूति (व कदाचित् परकी मदतही) ह्या उठावांच्या पाठीशी असावी ! ब्रिगेडियर बशीर बौआली ह्यांनी तुटपुंज्या शिकाऊ सैनिकांना चिथावून केलेला लष्करी उठावाचा केवळ साधा प्रकार तो नसावा, असं म्हणूनच वाटतं !! कालौधात अनेक गोष्टी बाहेर येतीलच. पण मोरोक्कोत आणखी बंडाळ्या माजल्या तर कुणालाही धक्का बसायला नको एवढं मात्र खरं !

□ □ □

# सुब्बाराव सुचवतात

मुदतपूर्व निवडणुकीत ५५ टक्के मतदान झाले, त्यापैकी ४४ टक्के मते सत्तारूढ काँग्रेसला पडली. म्हणजे एकूण मतदारांपैकी फक्त २४ टक्के लोकांनीच इंदिराबाईंना पाठिंबा दिला. त्यातूनच बाईंनी दोन तृतीयांशापेक्षा जास्त खासदार लोकसभेत आपल्या बाजूला बसविले. या आधीच्या निवडणकीतही हीच परिस्थिती.

केवळ २४ टक्क्यांचा पाठिंबा असलेला पक्ष कोटयावधींचे प्रतिनिधित्व करतो असं म्हणणं कितपत बरोबर आहे ?

हा प्रश्न आहे माजी चीफ जस्टिस के. सुब्बाराव यांचा.

उत्तर अर्थातच 'असं म्हणणं बरोबर नाही' असंच आहे.

याला पर्याय काय ?

सुब्बाराव सुचवतात–

राज्यसभा एकदमच बरखास्त करा. राज्यांच्या विधान परिषदाही बरखास्त करा. कारण असं की, राज्यसभेने किंवा विधान परिषदांनी सुचविलेल्यांपैकी एकही दुरुस्ती लोकसभेने किंवा विधानसभेने स्वीकारलेली नाही.

दुसरी सूचना : अपक्ष उमेदवार ही कल्पनाच काढून टाका.

तिसरी सूचना : प्रत्येक राज्याकरिता वेगवेगळी यादी करून मतदाराने तीमधील पक्षाला अनुक्रमाने प्राधान्य द्यावे. उमेदवाराला नव्हे.

या पहिल्या फेरीत दहा टक्क्यांपेक्षा कमी किंवा कमीत कमी मत मिळालेले पक्ष बाद होतील.

यादीत तीनच पक्ष उरेपर्यंत हे चालू ठेवायचे. नंतर मिळालेल्या मतांच्या प्रमाणात जागांची विभागणी करायची.

चौथी सूचना : पक्षांतराला आळा घालण्यासाठी : पक्षाचा राजीनामा देणाऱ्याला लोकसभा किंवा विधानसभेचाही राजीनामा द्यावा लागेल.

पाचवी सूचना : निवडणुकीपूर्वी एक महिना कारभार राष्ट्राध्यक्ष व राज्यपालांकडे जाईल. राष्ट्राध्यक्ष राष्ट्राचा प्रतिनिधी असेल, केवळ सत्तारूढ पक्षाचा नव्हे. तसेच राज्यपाल केंद्र सरकारचा नोकर नसेल तर तो राज्याचा प्रतिनिधी म्हणून वावरेल. आपला पक्ष विसरून त्याने विरोधकांशीही चर्चा केली पाहिजे. □

## दोन खलनायिकांची कथा

जुलै सहा. कलकत्ता (सिआल्डा) डायमंड हार्बर मार्गावर माग्राहट स्टेशनजवळ आगगाड्यांचा दुहेरी अपघात झाला, अठरा लोक ठार, अनेक जखमी, त्या अपघातामागची ही पार्श्वभूमी :

अपघाताचे अगदी मूळ कारण टेलिफोनच्या तारांची चोरी. होतार आणि माग्राहटमध्ये अशा प्रकारे संपर्क तुटला होता. होतारहून एक लाईट इंजिन माग्राहटकडे निघाले आणि शामपूर खेड्याजवळ थांबले. पाऊस जोरात चालू होता. नुकतंच उजाडत होतं.

याच वेळी माग्राहटकडूनहीं एक इंजिन निघालं होतारकडे. ते या थांबलेल्या इंजिनावर आदळलं, त्यात रेल्वेचे सहा लोक ठार झाले.

डायमंड हार्बरवर कडून एक गाडी होतारला येऊन पोहोचली. पण 'लाईन क्लिअर' असल्याविषयी संदेश नसल्याने स्टेशन मास्तर गाडीला पुढे जाऊ देईना. प्रवासी बिथरले, मग परिणाम काय होईल याची त्याला कल्पना आली. म्हणाला, 'गाडी जाऊ द्या. पण जरा सावकाशीनं.'

शामपूरपाशी काही खेडूत छत्र्या घेऊन रुळापाशी उभे राहिले. सहा जणांना ठार करणाऱ्या अपघाताची येणाऱ्या गाडीला कल्पना देण्यासाठी. अपघातातील इंजिनं तिथेच चक्काचूर होऊन पडली होती.

होतारकडून येणाऱ्या गाडीच्या इंजिन ड्रायव्हरने हा घोळका पाहिला. पण हे लोक चांगल्या हेतुने उभे राहिले आहेत, हे त्याच्या कसं लक्षात यावं? उलट त्याला आठवले ते काही दिवसांपूर्वी त्याच्याच गाडीला लुटणारे लोक. मग गाडी हळू करण्याऐवजी त्याने आणखीनच वेग वाढविला.

चक्काचूर झालेली इंजिनं वाट बघत असावीत. आणखी एक टक्कर झाली, आणखी बारा लोक मरणाच्या खाईत कोसळले.

पश्चिम बंगालमधील असुरक्षितता किंवा तिच्याबद्दलची भिती, त्या पोटी आपल्याच लोकांच्या सद्‌हेतुविषयीची शंका या दोन खलनायिकांची ही कहाणी आहे.



पृष्ठ १० वरून

त्यांच्या " अंमलदार " नाटकाचा एक अंक इथल्या निवांत वातावरणात लिहीला हे कळल्यावर ह्या वास्तुबद्दल थोडी अधिक जवळीक वाटली. 'इतकी सुंदर जागा होती तर माझ्या कोकण दौऱ्यातला आणखी एका दिवसाचा मुक्काम इथेच का रे ठेवला नाहीस ? ' असं जयप्रकाश नारायणांनी कळवून श्याम कोचरेकराला विचारल्याचं कळलं तेव्हा ह्या बंगल्याविषयी ममत्त्व वाटलं आणि बंगल्याचा म्हातारा खानसामा अब्दुल्ला हाच्या हातून तिरफळं घालून केलेलं मासळीचं सुकं कालवण चाटलं आणि सोलाच्या कढीचे भुरके मारले तेव्हापासून हा प्रवासी बंगला म्हणजे तर आपलं हक्काच घरच आहे असं वाटू लागलं !

बाजारात जाताना सागरतीराच्या उजव्या अंगाला झाडीत अगदी वेगळ्या आकाराची चमत्कारिक चर्च सारखी मोठी प्रशस्त इमारत दिसली ' ही डचांची वखार ' होय; शिवकालात कोकणात डचांची व्यापारी वसती होती. मात्र वेंगुर्ल्याच्या वर उत्तरेला कोकणात ते सरकले नाहीत. गुजरातेत सुरतेलाही त्यांची वखार होती. शिवचरित्राच्या ऐतिहासिक साधनात डच पत्र आहेत. ती ह्याच वखारीतल्या अंमलदारांची. वखार पाहीली. तळघर आणि भुयार असलेली ती एक चारशे पावसाळे पाहिलेली भक्कम वास्तु आहे. भिंती किल्ल्याच्या तटासारख्या लांब रुंद आहेत. गावसकर नांवाचे एक वृद्ध वेंगुर्लेकर माझ्यासोबत आहेत. ते म्हणाले, " पूर्वी ह्या वखारीत कुत्रं सुद्धा डोकावत नसे ! लोकांना भुताटकीची भीति वाटायची. पण वॉर टायमात हीला एकदम भाव आला. वेंगुर्लेकरांचे रेशन इथल्या कणग्यात भरून ठेवलेले असायचं ! अहो; माणसांप्रमाणेच काहीकाही वास्तूचाही भाग्योदय असतो. चला, तुम्हाला गावातलं एक देऊळ दाखवतो. त्या देवळाचाही भाग्योदय झालेला आहे.

देवळात काय पहायचं ? कोकणात काय बाळबोध देवस्थानं थोडी आहेत ?

देऊळ बैठं, कौलारू आहे.

गावसकर म्हणाले,

' ह्या देवळाचं वैशिष्ठ्य म्हणज स्वामी विवेकानंदांनी ह्या देवळाला भेट दिलेली आहे !'

' स्वामी विवेकानंद वेंगुर्ल्याला आले होते ? केव्हा ?'

' सनबीन कोण पाठ करतोय ? पण आलेवते हे नक्की. '

' पुरावा आहे ?'

' पुरावे कोण कशाला जपून ठेवणार ? इथे काय कज्जे लढवायचेत मुन्सफाच्या कोर्टात ?'

गावसकरांची समज फारच भाबडी आहे. वेंगुर्ल्यासारख्या कोकणी कुग्रामात

स्वामी विवेकानंद ऐंशी वर्षांपूर्वी कशाला येऊन गेले असतील ? त्यांच्या जीवनचरित्रातही तशी नोंद नाही. महाराष्ट्रात ब्याण्णव साली स्वामीजी आले होते. पण ती त्यांची फार ओझरती भेट ठरली. ते मुंबईत होते. पुण्यांतही फक्त तीन दिवस होते. लोकमान्यांच्याकडे त्यांचा आठवडाभर मुक्काम होता अशी जी आठवण सांगतात, ती साफ खोटी आहे. किंबहुना पुण्यातल्या तीन दिवसांच्या वास्तव्यात स्वामीजींची आणि लोकमान्यांची भेट तरी झाली होती की नाही ह्याची वानवाच आहे. किंबहुना, आर्यांचे मूळ वसतिस्थान भारताबाहेर होतं हा लोकमान्यांचा सिद्धांत स्वामीजींना रुचला नव्हता आणि आपल्या एका व्याख्यानात त्यांनी त्याबद्दल उपरोधिक भाषेत नापसंतीही दाखविली होती. मात्र त्या दोघांची भेट पुढे एकसाली कलकत्त्याला झाली होती. स्वामिजींच्या त्र्याण्णवसालच्या अमेरिकेतल्या विजयामुळे लोकमान्यांनी त्यांची खरी किंमत ओळखली होती आणि म्हणून त्यांनी स्वामिजींना महाराष्ट्रभेटीचं आमंत्रण देऊन ठेवलं होतं. पण स्वामिजी त्यानंतर महाराष्ट्राकडे फिरकलेच नाहीत. वेंगुर्ल्याकडे तर नाहीच नाही. स्वामिजींना महाराष्ट्रात, उमरावतीचे ' रामकृष्ण वचनामृत ' कर्ते कै. परांजपे वगळता, कोणी चहाता, सहकारी किंवा शिष्य मिळाला होता असा दाखला उपलब्ध नाही. गुजरातेतला एक छोटा संस्थानिक त्यांचा भक्त होता नि त्याच्याकडे स्वामिजी गेले होते. कर्नाटकसिंह कै. गंगाधरराव देशपांड्यांची नि स्वामिजींची स्वामिजींच्या गरगरीत पोटाच्या आकारावरून चेष्टामस्करी झाली होती असं सांगितलं जातं. पण तेही असत्य आहे.

मी हे सर्व पुराण गावसकरांना सांगितलं. ते थंडपणे म्हणाले, ' म्हणजे आमचे बापजादे आजवर सांगत आले ते खोटं, नि तुम्ही पुस्तकातल्या चार ओळी सांगता ते खरं ? अज्ञानेच आमच्या धर्माचा लय झालाय ! '

' ह्यात धर्माचा प्रश्न येतोच कुठे ?'

' जिथे जिथे श्रद्धेचा प्रश्न आहे, तिथे तिथे धर्माचा प्रश्न आहे. आमच्यात श्रद्धा नाही म्हणून धर्माचा ऱ्हास झालाय. बुवाबाजी नि देव-देवस्कीबद्दल मी बोलत नाही. खऱ्या हिंदु धर्माबद्दल बोलतोय. मुसलमान बघा, ख्रिश्चन बघा. ते आपापल्या धर्माला कसे घट्ट आहेत आणि आमचे हिंदु बघा ! तुम्ही काही सांगू नका हो, आज ह्या भूमीला फक्त एकाच गोष्टीची आवश्यकता आहे—दुसऱ्या स्वामी विवेकानंदांची ! '

आम्ही बाजारात आलो. इथल्या मंडईचंही नाव ' क्रॉफर्ड मार्केट 'च आहे. छतावर घड्याळाचा मनोरा आहे. बाजारातल्या सर्व माळणींच्या डोक्यात अबोलीचे टपोरे गजरे होते. अबोलीचे गजरे आणि फणसाचे सुटे कापे गरे बाजारात विक्रीला मांडलेले होते. शहाळी—नारळही होते.

' इथे स्वस्त काय मिळतं ?' मी विचारलं.

' तुम्हांला स्वस्त माल हवाय ? मग मुंबईलाच तो मिळेल. इकडे सगळी भामटे-

गिरी आहे ! ह्या वेंगुर्ल्यांत कधी कुणी अबोलीची फुलं विकली होती ? अहो, ह्या वेंगुर्ल्यात थुकलं तरी अबोली उगवत्याय ! अशा ह्या अबोलीच्या परिसरात एका गजऱ्याला दहा पैसे मोजावे लागताहेत–नि मुंबईकर दिसले तर पंधरासुद्धा !' गावसकर म्हणाले.

' ह्याचा सरळ अर्थ असा की काही लोकांची पोटं भरताहेत. ही चांगली गोष्ट आहे. '–मी.

' भरू देत की. पण मधल्यामध्ये आम्ही भरडले गेलो त्याचं काय ? सरकारने मच्छिमारीविकासाचं खूळ काढलं. होड्यांवर इंजिनं बसवली. मी म्हणतो ' बसवा.' हे दर्यात गेले. मी म्हणतो ' जा. दर्या काय आमच्या बापाचा आहे ?' ह्यानी मासळी काढली. ढिगांनी काढली. पण पुढे काय ? ती ह्यांनी इंग्लंड–अमेरिकेला पाठवली ! म्हणजे हिशेब काय झाला ? जी मासळी आम्हांला मिळायची ती ह्यांनी पळवून नेली. बरं, विक्रीचे पैसे इकडल्या भागात परत आले म्हणता ? रामा शिवा गोविंदा ! त्यांची वाट परस्पर दुसरीकडेच लागते ! म्हणजे मासळी परी मासळीही गेली, नि पैशापरी पैसाही गेला ! ह्या कोकणाचं नशिब हे असं आहे ! '

' मग ह्यावर उपाय काय ?'

' एकच. स्वामी विवेकानंदांसारखा डिक्टेटर यायला हवा !'

' तो काय करेल ?'

' तो ह्या सुलतानांच्या ढुंगणांवर लाथा घालेल; नि धर्ममंथन करून ही आर्यभूमी निर्यवन करून टाकेल !'

' विवेकानंद कधीही कुठल्याही धर्माविरुद्ध बोललेले नाहीत. '

' ह्यालाच म्हणतात मुत्सद्देगिरी ! आणि म्हणून आम्हांला विवेकानंदांसारखा मुत्सद्दी डिक्टेटर हवाय !'

वेंगुर्ले फार छोटं, सड्यावर वसलेलं प्रकाशाचं गाव आहे. चार दोन धंदे गावात टुकूटुकू चालतात. गावातली सगळी कर्ती माणसं मुंबईला आहेत. तिथून मनीऑर्डरी येतात म्हणून गावातल्या चुली पेटतात आणि गावसकरांसारखी म्हातारी माणसं आठ आण्यांची मोड आणि मासळीच्या पिशव्या घेऊन गाबतिणींच्या फाट्यांसमोर तासंतास पिरंगू शकतात. कोकणाच्या ह्या भागात काजूचं उत्पन्न दांडगं आहे असं आपण गृहीत धरलं आहे इथे काजूबिया तयार करण्याचे सहा सात कारखाने मोसमानुसार नरम-गरम स्थितीत चालू असतात. कोकणातल्या कच्च्या मालातून असाच पक्का माल तयार झाला पाहिजे म्हणजे कोकणाचा भाग्योदय होईल, हे अर्थशास्त्राचं चोपडं न वाचताही आपल्याला पटलेलं असतं. खुष होतो. हॉटेलमध्यें सबनीस नावाच्या गावसकरांच्या एका स्नेह्याची भेट झाली. सबनीस म्हणाले,

' अहो, ही शुद्ध चांचेगिरी आहे ! मुळात हा भाग दरिद्री. इथले काजू सात-सवाई दरिद्री. त्यांचा दर्जा बाजारपेठेत टिकत नाही. मुळात ह्या कारखान्यांना लागतो तेवढा काजूही ह्या मुलखात निघत नाही. सगळा माल केरळातून आणतात आणि केरळातल्या काजू कारखान्यासाठी काजू आफ्रिकेतून आणतात ! व्यवहार हा असा उलटा चाललाय !'

' मग ह्याच्यावर उपाय काय ?'

' आमचं म्हणणं एकच : तुम्ही काहीही उपाय करू नका. फक्त, कुळांच्या घशात कोंबलेल्या आमच्या जमिनी आम्हांला परत करा ! घरच्या भाताची आम्ही पेज पिऊ. वर विहिरीचं पाणी पिऊ. आमच्या घरात संतुष्ट राहू. पण हे लोक हे करणार नाहीत, कारण ह्यांना जग सुधारायचंय ना ! बाकी, सुधारा म्हणा—कारण, तुमचे किती दिवस शिल्लक उरलेत ते दिसतंयच आम्हाला !'

पुन्हा एकदा मी हात टेकले.

मोचेमाडची खाडी. लहान मुलाच्या बोबड्या बडबडीप्रमाणे वारं भुळूभुळू वहात आहे. तर आली की आम्ही खाडीपार होणार. आरवलीला जाणार. भाताची सुकी खाचरं दूरवर पसरलेली दिसत आहेत. बगळ्यांच्या शुभ्र माला त्यांच्यावरून पंखांची फाक्फाक् करीत तरंगत जात आहेत. झिणझिण्या उठाव्यात तसं खाडीचं भरतीचं पाणी सळसळत आहे. काठावरची हिरवी जर्द झाडी पाण्यात डोकावली आहे. ऊन फार प्रसन्न पडलं आहे.

राजाध्यक्ष नावाचे वयस्क गृहस्थ माझ्या सोबतीला आहेत. मी त्यांना म्हणालो,

' तुम्ही लोक लाईफ खऱ्या अर्थाने एन्जॉय करता. '

' म्हणजे ?'

' हे असं ऊन, हा असा वारा, ही अशी उघडीप, मुंबईला पांचशे रुपये कुणी देऊ केले तरी मिळेल का ? ह्या हवेवरच तुमच्या आयुष्याची पाच वर्षे वाढतील. '

' आदलाबदल करू या का ? बोला. मी तुमची मुंबईची नोकरी करतो. तुम्ही ही हवा खायाला ह्या गावंढयात या. अरे, ह्या शिष्ट लोकांच्या बोलायच्या गोष्टी आहेत. आमची दु:खं आम्हांला माहीत. '

' जाऊ द्या हो जमाना बदलतोय. '

' पण कुणाच्या फायद्यासाठी ?'

' लोकांच्या !'

' अहो विसरा हो ! इथल्या एका कुणब्याच्या ढुंगणावर चड्डी आलेली नाही. '

' सध्या जितक्या घरांवर मंगलोरी कौलं दिसताहेत तेवढी पूर्वी दिसायची ?"

' हा वरवरचा देखावा आहे. एकजात सगळे कर्जबाजारी आहेत. हल्ली सर्वांच्या सोसायट्या झाल्या आहेत ना !

' तरीसुद्धा शेतीमालाचं उत्पादन निश्चितपणे वाढलं आहे. '

'पण मलई कोण खातंय? फक्त श्रीमंत! आमच्या गावात आजगावकर म्हणून आहेत. ते झाले सोसायटीचे अध्यक्ष. आणि गेल्या चार वर्षात गृहस्थाने काय साडेसातशे कलमांची बाग लावावी? पण लावलीन. आता ह्या वर्षी आणखी अडीचशे लावेल नि पुढल्या वर्षी हजार कलमांचा शेटसावकार होईल! आणि गावकऱ्यांना मात्र म्हणतो की मिरचीची रोपं लावा, तुमच्या मिरचीला मिलटरी कॉन्ट्रॅक्ट मिळवून देतो. आमचे लोकसुद्धा मूर्ख! सगळे मिरच्या लावताहेत! म्हणजे आणखी दहा वर्षांनी चित्रं काय दिसेल? आजगावकरांच्या हापूस आंब्यांचे ट्रक्स क्रॉफर्ड मार्केटात उभे राहतील नि गावकऱ्यांची पोरं पाच पाच पैशांचे मिरचीचे वाटे खपवण्यासाठी सडकेवर उन्हात बसलेली असतील! आणि आम्ही हे बोलली तर आम्ही गावकीचे दुष्मन ठरणार! नि देसाई ह्यांचा पुढारी होणार! काही बोलण्यात अर्थच नाही. आला दिवस आम्ही नुसता ढकलतो आहोत. 'काळयाची कृपा म्हणून अजून दोन वेळेला जेवतोय तरी!

'काळया कोण?'

'काळया म्हणजे वेतोबा! ह्या समस्त भूमीचा देव.'

मोचेमाडची तर ओलांडून आरवलीला आलो. आरवली श्री वेतोबाच्या देवळासाठी प्रसिद्ध आहे. देऊळ भव्य आणि गोवेकरी पद्धतीचं आहे. वेतोबाचं वैशिष्ठ्य म्हणजे हा रखवालदार देव आहे. त्याची मूर्ती इतर देवांच्या मूर्तीसारखी दगडाची वा धातूची नसते. फक्त फणसाच्या लाकडाची असते. त्याच्या हातात समशेर असते. वर्ण ठार काळा. जोडीला तो अनार्यही आहे. पिशाच्च योनी ह्याच्या अंकित आहे. म्हणून ह्या भागात त्याला लाडाने 'काळया'च म्हणतात. 'काळया स्वप्नात आलावता' असं बोलण्याची रीत आहे. काळयाची मूर्ती फक्त फणसाच्या लाकडाची करीत असल्यामुळे त्याचे भक्त फणसाच्या लाकडाच्या पाटावर जेवायला बसणार नाहीत, फणसफळीच्या झोपाळयावर टेकणार नाहीत, की फणसाचं लाकूड कदापीही जाळणार नाहीत! ह्याला नैवेद्य फक्त केळयांचाच चालतो. म्हणून वाजंत्री लावून देवळापर्यंत वाजतगाजत आणलेला केळयांचा घड वाहाण्याचा नवस ह्या काळयाला अनेकजण करतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ह्याला फुलांच्या माळांचा अंगरखा आवडतो. सुरंगी आणि अबोलीच्या फुलांचा लांबरुंद झगा ह्या काळयाला फार शोभून दिसतो. सर्व गाव झोपी गेलं की पायात फूट-दोन फूट लांबीची भक्कम पादत्राणं घालून हा गस्त घालायला सुरुवात करतो अशी श्रद्धा आहे. एका कोपऱ्यात त्याने गस्त घालून घालून झिजवलेल्या पादत्राणांची भली मोठी रास ठेवलेली आहे.

'ही आपण पहात आहोत ती मूर्ती वीस साली प्रतिष्ठित झाली.' राजाध्यक्ष म्हणाले.'

'त्यापूर्वी काय होतं?'

" त्यापूर्वीही फणसाच्या लाकडाचीच मूर्ती होती. तिला वाळवी लागली म्हणून ती काढली नि ही ठेवली.'

'काढलेली मूर्ती कुठे गेली ?'

'देवाची पूजेतली मूर्ती ठेवणार कुठे ? जागाच मिळेना. बरं, पाण्यात विसर्जित केली तर ती तरंगून परत किनाऱ्यालाच लागणार. म्हणून महाजनांनी ती इथल्या एका डोंगरमाथ्यावर आडवी घालून ठेवली ! त्या डोंगराला दुर्गाडं म्हणतात. पुढे पाऊसपाणी नि उन्हं ह्यांचा मारा होऊन ती पंचमहाभूतात आपोआप विलीन झाली !'

समशेरधारी वेतोबाची डोळे वटारलेली तगडी मूर्ती भयचकित करणारी आहे.

'हा देव आपल्याला हवं ते भक्तांकडून मागून घेतो. तुम्हाला जयवंत दळवी माहीत आहेत मुंबईचे ? लेखक.'

'चांगलेच.'

'त्यांचे वडील द्वारकानाथ हे ह्या काळचाचे परम भक्त. इथेच रहायचे. एकदा काळचा त्यांच्या स्वप्नात आला नि म्हणाला, 'मी काळोखात आहे. दिवा लाव. रातोरात द्वारकानाथ देवळात गेले. बघतात तर देवळातले लामणदिवे विझून


माणूसच्या वाचकांना परिचित

**प रा जि त - अ प रा जि त**

लेखक : वि. स. वाळिंबे – पृष्ठे : ३७५ सुमारे – किंमत : २० रुपये

**प्रकाशन दिनांक ४ सप्टेंबर १९७१** | गेल्या शंभर वर्षाच्या फ्रान्सच्या राजकीय वाटचालीमधील कृष्णक्षण आणि सुवर्णक्षण टिपणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ.

प्रकाशनपूर्व सवलतीचे मूल्य फक्त १२ रुपये.

आपल्या नजीकच्या ग्रंथविक्रेत्याकडे अगर आमचेकडे पैसे भरून मागणी नोंदवा.

**विश्वकर्मा साहित्यालय,**

२०३५/२ सदाशिव, टिळक पथ, पुणे ३०.

काळोख झालेला ! मग त्यांनी लामणदिवे लावले नि ते घरी परतले. असे साक्षात्कार घडवतो हा.'

मी एक केळ्याचा घड विकत घेतला नि भेट म्हणून काळ्याला देऊन टाकला. आरवलीत एक चक्कर मारली. जिकडे तिकडे अबोलीचे हार दिसले. सडकेवर कोळणी मासळीच्या टोपल्या घेऊन बसल्या होत्या. तोंडाला पाणी सुटलं.

आरवलीपासून मैलावर शिरोडा आहे. वि. स. खांडेकर तिथल्या टय़ुटोरियल इंग्लिश स्कूलमध्ये अत्यल्प वेतनावर शिक्षक म्हणून बरीच वर्षे काम करीत होते. नंतर ते चित्रपट लेखनात नशिब काढायला आरवली सोडून वर घाटावर कोल्हापुरास गेले. शिरोडय़ात ते फक्त शिकवीत. त्यांचं बिऱ्हाड होतं खुद्द आरवलीला आप्पा रेग्यांच्या कौलारू घरात. शाळेच्या पलीकडे मिठागरं आहेत. तिथेच मिठाचा सत्याग्रह झाला होता.

रेडी. नुसते रखरखीत डोंगर. तांबूस वर्णाचे. समुद्रात पाय रोवून भजनातल्या फडकऱ्यांप्रमाणे दाटीवाटीने उभे राहिलेले. युगेयुगे ते असे बोडके, उन्हं खात, वारा खात, तिष्ठत आहेत. त्यांच्या तांबारलेल्या अंगलटीमुळे लोक त्यांना भस्माचे डोंगर म्हणू लागले. किरिस्ताव म्हणू लागले, 'भस्माचे नव्हेत, बिशपचे डोंगर.' पुढे दोन गोष्टी झाल्या : एक, ह्या डोंगराच्या पोटात कच्चं लोखंड आहे असा शोध लागला. मातीचं सोनं झालं. जपानी बोटी ती लोहमिश्रीत माती वाहून स्वदेशात न्यायला रेडीच्या किनाऱ्यावर येऊ लागल्या. दोन, ह्या सर्व क्रांतीवर मुंबईच्या श्रीराम कामतांनी 'भस्माचे डोंगर' ही विलक्षण प्रभावी कादंबरी लिहिली—जी दुर्दैवाने अजूनही पुस्तकरूपाने उपलब्ध नाही !

खाण म्हणजे काय हे मी माझ्या डोळ्यांनी पहात आहे. बलाढ्य बुलडोझर्स डोंगराचं पोट फोडून टाकत आहेत. हजारो मजूर ते ढेपाळलेले दगड प्रचंड ताकदीच्या वाहनांमध्ये टाकत आहेत. वाहनं ते दगड बंदरावर नेत आहेत. बंदरात मोठमोठ्या परदेशी मालवाहू नौका उभ्या आहेत. रेडीतली तांबडी माती जपानला, युगोस्लाव्हियाला, इटालीला जात आहे.

'चला, ह्या धंद्यामुळे स्थानिक मराठी मजुरांची सोय झाली म्हणायची.' मी तिथल्या मुकादमाला म्हणालो. तेव्हा तीव्र नापसंती दाखवीत तो म्हणाला,

'नाव काढू नका तुम्ही मराठी मजुरांचं !'

'का ?'

'अरे, हातापाया पडून म्हटलं की, बाबांनो या, काम करा. अशी पैसे मिळवायची संधी पुन्हा येणार नाही. पण एक माणूस येईल तर हराम ! घरी रिकामटेकडे बसून राहिले, पण कामाला आले नाहीत. शेवटी आम्ही हैद्राबादहून कामाठी मजूर भाडेखर्च लावून आणले ! तुम्हाला दिसताहेत हे सगळे एकजात कामाठी मजूर आहेत आणि हे कामही ताठ करतात. आपले मराठी मजूर म्हणजे पानतंबाखू

चोळणार, वामकुक्षी करणार, चहा पिणार. हे कामाठी लोक साताला कामाला जुंपले की, थेट जेवणाच्या सुटीपर्यंत नि परत कामाला लागले की, अगदी सूर्य मावळेपर्यंत. का नाही त्यांना पैसे मिळणार ? आमचे मराठी लोक, आणि त्यातल्या त्यात कोकणातले, म्हणजे एकजात सगळे लीडर्स !'

ह्या निष्पर्ण बोडक्या डोंगरमाथ्यावरसुद्धा काही कर्मचाऱ्यांनी आपले संसार फुलविले आहेत. ते फुलविता येतीलही म्हणा. पण मला राहून राहून कौतुक वाटलं ते एका ख्रिश्चन गृहिणीला त्या डोंगरावर अबोलीचे वाफे लावताना पाहिल्यावर. म्हणजे मुलं आणि फुलं ह्या दोन्ही आशा लावणाऱ्या गोष्टी सिद्ध असल्याशिवाय गृहिणीचं जीवन पूर्ण होत नाही म्हणायचं.

रेडीच्या डोंगराच्या पलीकडे तेरेखोलची खाडी. ती ओलांडली की गोव्याची हद्द सुरू होते. मी ती गोमंतक भूमी समोरच पहात होतो. जो टापू माझ्या दृष्टीक्षेपात होता, नेमक्या तिथेच अमिचंद पंजाबी आणि हिरवे गुरुजी ह्या दोन हुतात्म्यांचं रक्त अगदी परवा परवा गोव्याच्या मुक्तीसंग्रामात सांडलं होतं. आता त्यांचं तिथे काय उरलं होतं ? ज्यांनी आपल्या प्राणांची कुर्बानी केली त्यांच्या नावे तिथे साधा चिरासुद्धा नाही ! भाई, जनताजनार्दनाची दानत ही अशी आहे! विमनस्क मनाने मी परत फिरलो. जिपमध्ये चढणार इतक्यात धावत धावत एकजण माझ्या दिशेने आला म्हणाला, 'तुम्ही पुन्हा केव्हा येणार ? ही घ्या आमची भेट. लोभ असू द्या.' भेटीदाखल त्याने अबोलीची फुलं माझ्या ओंजळीत दिली होती. इतकी टवटवीत, नाजुक अबोलीची फुलं इतक्या गच्च संख्येने मी जन्मात कधी हातात घेतलेली नव्हती ! जिप पुढे पुढे पळत होती. मन परत परत सांगत होतं, अरे, हा सारा अबोलीचाच परिसर आहे. ◻ ◻ ◻

## विदेश वार्ता

पृष्ठ ७ वरून

नोंदणी सुरू केली आहे. शेवटचा आकडा पाहून नवी कॉलेजं उघडण्याचा प्रयत्न होईल.

यातून निष्कर्ष काय ?

(१) आधीच दर्जा नसल्याची ओरड असणाऱ्या दिल्ली विद्यापीठाने चाळीस टक्केवाल्यांना प्रवेश देवविण्याचा अट्टाहास केला, त्यातून दर्जा अधिकच खालावणार आहे.

२. विद्यापीठाव्यतिरिक्त दिल्ली ॲडमिनिस्ट्रेशनला आपल्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांची काळजी आहे. यादी झाल्यानंतर नवी कॉलेजं काढण्याचा आग्रह ते धरू शकतील.

३. पत्रव्यवहाराने शिक्षण यावर विद्यार्थ्यांचा विश्वास नाही.

४. कुठेच काही प्रवेश मिळाला नाही तर विद्यार्थी मध्यप्रदेश सारख्या विद्यापीठातून सोपी पदवी मिळविण्याच्या मागे लागतात. त्याचीही सोय इथली खाजगी कॉलेजं करून देतात. ◻ ◻ ◻

## मुंबई वार्ता

पृष्ठ ४ वरून

आला नाही तर मराठवाड्याचे तेलंगण होईल असे वारंवार इषारे ते विधानसभेत देत असतात. यावेळी जर मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद मिळाले नाही तर हे आमदार आपले इषारे खरे करून दाखवितील असे दिसते. एका कॉंग्रेस आमदारानेही सांगितले की मराठवाडा कॉंग्रेसमध्ये सुद्धा हीच भावना आहे, त्यामुळे मराठवाड्यांत तेलंगणसारखी परिस्थिती सहज निर्माण होऊ शकेल. म्हणूनच म्हण शंकरराव चव्हाणांचा आग्रह आहे. मुख्यमंत्रीपद स्वतःला नाही मिळाले तरी चालेल. पण मराठवाड्याला मिळाले पाहिजे.

मराठवाडा विद्यापीठाच्या निमित्ताने याबाबतीतल्या मंत्रीमंडळातल्या कारवाया बाहेर आल्या. प्रकरण कितीही झाकले तरी ते वर आल्याशिवाय राहत नाही. एक म्हणजे कुलगुरुंची निवड राजकीय वादाचा विषय होणे हेच वाईट. या निवडीत, एक जबाबदार मंत्री हस्तक्षेप करीत आहेत असा आरोप होता. त्या आरोपाचे ते खंडन करताहेत तो पुन्हा त्याच आरोपाचा पुनरुच्चार दुसरे मंत्री करताहेत. एकूणच दृश्य कसेसेच दिसते.

अशी भांडणे चालू असतांना मराठवाडा विद्यापीठाचा कारभार कसा चालू आहे? छा ऽ ऽ ऽ न चालू आहे. विद्यापीठाच्या मराठी-विभागाचे प्रमुख प्रा. वा. ल. कुलकर्णी यांना मुदत वाढ देण्याचा विद्यापीठाच्या एक्झिक्यूटिव्हने ठराव केला. पण कुलगुरुंच्या मुदतवाढीला विरोध. त्यांनी श्री. कुलकर्णी यांचा पगारच चार महिने दिला नाही म्हणे. असं चालू आहे.

विद्यापीठीय राजकारणाचे अनेक स्तर असतात. कुलगुरुंच्या निवडीबाबत कसे उच्च पातळीवरील राजकारण चालते हे आपण पाहिलेच. त्यापेक्षा थोडा खालचा थर पुणे विद्यापीठात दिसला. कुलगुरुनंतर येते प्राध्यापकांच्या नेमणुका, बदल्या, बढत्या आदींचे राजकारण. त्याखाली क्रम लागतो विद्यार्थ्यांची निवड, शिष्यवृत्त्यांची वाटणी वगैरे – या शेवटच्या प्रकारात कृषि विद्यापीठातला गैरकारभार उजेडात आणून पुण्याच्या विद्यार्थ्यांनी मोठेच काम केले यात शंका नाही.

त्याहीनंतर येते क्रमिक पुस्तकांच्या नेमणुकीचे राजकारण. मग क्लासेसचे राजकारण, परीक्षांचे राजकारण, पेपर्स-तपासणीचे राजकारण, निकालाचे राजकारण असे राजकारण हे सर्वव्यापी आहे. या विद्यापीठीय राजकारणाचा प्रत्येक पदर हा चमत्कृतीपूर्ण, माल-मसालायुक्त असा स्वतंत्र विषय असतो. उच्च कोटीचे राजकारण कसे असते ते आपण पाहिले. वेळप्रसंग येईल तेव्हा बाकीच्या विषयांचा अभ्यास करू.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. व. वाजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२९ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलीची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



बाळाचे दूध, सकस अन्न, कपडे, खेळणी पुस्तके व इतर अनेक लहानसान गोष्टी या सर्वांची निश्चित तरतूद तुम्ही त्याच्यासाठी करणारच. आणि हे सर्व सोपे नसले तरी कसेही करून तुम्ही ते पुरवाल. पण इतक्यातच आणखी एका मुलाची जबाबदारी वाढली म्हणजे ! अशी वेळ येऊ न देणे हेच योग्य नाही काय !

आज लक्षावधि जोडपी हेच करीत आहेत. ती परिस्थिति अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे, पुरुषांनी वापरायचे खरी संतति-प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत !

**सर्वत्र मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा. सोपा जाणा

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे. बिनधोक संतति-प्रतिबंधक!

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/111




" विद्यार्थी म्हणून प्रवेश देणं शक्य नसेल तर कार्यकारिणीवर तरी नेमून घ्या म्हणते मी ?..."